## प्रकरण तिसरे

### विविध ज्ञान विस्तारातील स्त्री विषयक लेखातील वैचारिकता

प्रस्तावना:- मानवाचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन काही कारणाने बदलतो तेंव्हा त्यास प्रबोधन, परिवर्तन असे म्हणतात. मानवी जीवनातील हे परिवर्तन, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक इ. सर्व क्षेत्राला व्यापून घेणारे असते. रुढीप्रियता ग्रंथप्रामाण्य, परंपराप्रियता इ. यामुळे समाजजीवनाला आलेली स्थिती-शीलता बुध्दीनिष्ठ आणि तर्कनिष्ठ कसोटीवर पारखून बघीतली जाते आणि त्यामुळे मानवीजीवनात स्थित्यंतर घडून येते. नव्या विचारसरणीमुळे जुन्या विचारसरणीतील दोषगुण दिसू लागतात.

१९ वे शतक हे असेच नव्या विचारसरणीचे दुरगामी परिणाम साध-णारे शतक आहे. म्हणून रुढिग्रस्त झालेल्या भारतीय संस्कृतिच्या परिवर्तनाचा पाया घालणारे हे शतक आहे असे समजले जाते. सामाजिक क्रांतीची झुळूक ब्रिटि-शांच्या उदारमतवादी, भूतदयावादी व ज्ञाननिष्ठ विचारसरणीच्या झंझावाता-मुळे संपूर्ण भारतवासीयांना स्पर्शून गेली होती. प्रबोधनाचे युग म्हणविले जाणा-रे १९वे शतक आपले आगळे वेगळे वैशिष्ठ्य पूर्ण अस्तित्व घेऊन भारतात प्रस्थापित झाले. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वत्रयीवर आधारलेली नवीन विचारसरणी, भारतीयांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणणारी ठरली.

परिवर्तन हा मानवी स्वभावाचा गाभा आहे. आदी मानवापासून होणा-या नवनव्या घडण घडणीचा इतिहास मानवाच्या परिवर्तनीय स्वभावाचा साक्षीदार आहे पण हे स्थित्यंतर सहजासहजी घडून येत नाही तर त्यामागे कांही कारणे असतात.

एकोणिसाव्या शतकात झालेल्या प्रबोधना मागेही असेच कारण मीमांसा होती. धर्म, रूढी, परंपरा यात विलक्षण कर्मठपणा आला होता. समाजजीवनात व्यक्तीच्या जीवनमूल्यापेक्षा रूढी, परंपरेचे प्राबल्य आणि मूल्य अधिक मानले जाऊ लागले. त्यामुळे समाजात अराजकता माजली होती पण ...

१९ व्या शतकात मात्र पाश्चात्य संस्कृतिशी आपला संपर्क आला आणि संबंध जनजीवनात अमुलाग्र बदल घडवणारे विचार प्रवाह वाहू लागले. "ज्ञानसंवर्धन आणि विचार जागृती हा सामाजिक जीवनाचाच एक भाग असल्याने समाजातील ब-याचाईट प्रवृत्तींचे व शक्ती संवर्धनाचे पडसाद ह्या क्षेत्रातही उमटल्याखेरीज राहात नाहीत." [१]

महाराष्ट्रातही अशी विचार जागृती व्हायला सुरवात झाली होती पाश्चात्य संस्कृतीमुळे नव विचारांचे वारे इथे नवी ज्ञानदृष्टी घेऊन वाहू लागले होते. विष्णूबुवा ब्रह्मचारी, बाळशास्त्री जांभेकर यांनी समतेवर आधारलेले नवविचारांचे झंझावात समाजमनात निर्माण करावयास सुरवात केली होती. आगरकर लोकहितवादी, जोतिराव फुल्यांनी, सुधारणावादी विचारसरणीला वादळी स्वरूप दिले, तर नियतकालीकांनी या विचारांचे तुफान सातत्यानी, जुन्या विचारसरणीला चिटकून बसलेल्या सनातनी विचारांच्या विरुध्द उठवून सामाजिक परिवर्तनाला योग्य दिशा देण्याचा नेटाने प्रयत्न केला आहे. "आंग्लाईच्या आरंभी जे नवे समाजजीवन सुरु झाले, जी वैचारिक आंदोलने झाली ती अतिशय व्यापक स्वरूपाची होती."[२]

मुळांत प्रबोधन, परिवर्तन व उत्क्रांती या प्रक्रिये मध्येच एक परिपक्व वैचारिक बैठक असते. यात विचारवंताना अभिप्रेत असलेले बदल, सहजा सहजी घडून येत नाहीत. तरी बदल घडवून आणण्यासाठी महत्प्रयास करावे लागतात. तसा बदल घडवून आणणे ही समाजहितासाठी गरजेचे असते. म्हणूनच प्रबोधन आणि परिवर्तनाचा इतिहास, मानवी जीवनास आजपर्यंत मार्गदर्शकच ठरला आहे.

## महाराष्ट्रातील वैचारिक क्रांतीची पार्श्वभूमि

प्रस्तुत प्रकरणात १९ व्या शतकात महाराष्ट्रात जी वैचारिक क्रांती झाली तिचा थोडक्यात आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. कारण त्यातच स्त्री जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोनही सामावलेला आहे.

आपली संस्कृति प्रामुख्याने धर्माधिष्ठीत आहे. या धर्माच्या नावाखालीच इथे, धर्माची सुत्रे स्वतः च्या हातात घेतली होती. बहुजनसमाज अज्ञानामुळे त्यातील वास्तवते पासून खूप दूर ठेवला गेला होता. त्यामुळे शोषीत आणि

शोषकांचा वर्ग निर्माण झाला आणि इथेच नैतिक अध:पतनाला सुरवात झाली. इंग्रजांची राजवट इथे स्थिर झाली तेंव्हा जातीभेद, जुलूम, जबरदस्ती, पिळव-णूक, धर्माच्या जाचक बंधनांचा अतिरेक तर एकीकडे ऐषोआराम, सुखलोलुपता, उपभोगीवृत्ती, स्वार्थीपणा याचा अतिरेक झाला. त्यामुळे संपूर्ण समाज-जीवनात सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, सामाजिक, क्षेत्रात विलक्षण दरी निर्माण झाली. भ्रष्ट विचारसरणी, स्वास्थ्यामुळे झालेली क्रूरवृत्ती, कुबुध्दीचा प्रभाव बंधुभावाचा अभाव, व त्यामुळे सर्वत्र पसरलेली अनैतिकता सामाजिक जीवनाला त्यामुळे उतरती कळा लागली व त्यातच इंग्रजांची भूतदयावादी, उदारमतवादी राजवट स्थिर झाली. लोकांना नवी दिशा आणि नवे जीवन प्राप्त होण्या-ची आशा वाटू लागली.

सामाजिक अवनतिची कारण मीमांसा शोधणे मग विचारवंतांना अपरिहार्य वाटू लागले. ब्रिटिशांचा सहवास आपणास लाभताच त्यांच्या संस्कृतितील वैशिष्ठ्ये कळत नकळत आपल्याला जाणवू लागली व त्यामुळे आत्म-परिक्षणाला सुरवात झाली व नवे-जुने, सुधारक-सनातनी, यांच्यात विचारांचे मंथन सुरु झाले.

महाराष्ट्रात पेशव्यांच्या खिळखिळ्या आणि जीर्ण झालेल्या कार-कीर्दिचा अंत झाला व इंग्रजांच्या नव्या दमाच्या राज्यकारभाराने आपल्यात कायापालट घडवून आणण्यास सुरवात केली कारण" या सत्तेच्या मागे नव्या ज्ञानविज्ञानाचे सामर्थ्य होते. इंग्रजी राजवटीमुळे हिंदूस्थानच्या व महाराष्ट्राच्या जीवनात कांही महत्त्वपूर्ण फेरबदल घडून येण्याच्या प्रक्रियेला सुरवात झाली."[3]

आणि नवविचारांची दृष्टी प्राप्त झालेल्या सामाजिक कार्यकर्त्यांचे विचार गती-मान झाले व आचरणातही गती मिळाली. समाजाच्या अधोगतीची कारणे बघीतली जाऊ लागली, तेंव्हा दास्यत्वाने पूर्णपणे बंदिस्त झालेल्या "स्त्री" शुद्रादिकांना दास्यमुक्त करुन नवजीवन देण्याची आवश्यकता समाज धुरीनांना वाटू लागली. जातीभेदामुळे शुद्र आणि धर्माच्या जाचक बंधाने "स्त्री" संपूर्ण-पणे जायबंद झाली होती. प्रस्तुत प्रकरणात स्त्री विषयक दृष्टीकोनाचा अभ्यास करावयाचा आहे. तो विविधज्ञान विस्तारातील स्त्री विषयक लेखातील वैचारिकतेचा, तत्पूर्वी संबंध महाराष्ट्रात जी स्त्रीकडे बघण्याची व तिच्या समस्या सोडविण्यासाठी वैचारिक क्रांती झाली तिचा आढावा घेणे आवश्यक

आहे.

## समाजाचा स्त्री विषयक दृष्टीकोन:-

स्त्रीही पुरुषांइतकाच महत्वाचा समाज घटक आहे. हे एकंदर तिच्या जीवन जगण्याच्या पध्दतीमुळे आपण विसरूनच गेलो होतो व तिला दासी करून टाकले होते. दास्यत्व पत्करलेल्या व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व नसतेच. त्यामुळे तिचे व्यक्तीगत जीवनमान अतिशय निकृष्ठ अवस्था प्राप्त झालेले होते.

ज्या स्त्रीमुळे नवजीवन प्राप्त होते तिलाच धर्माच्या नावाखाली, आपल्या संस्कृतिने शुद्र ठरवून तिच्यावर दास्यत्व लादले आहे हा विचार १९ व्या शतकातील नव्या विचारसरणीच्या लोकांना सातत्याने खटकत होता. प्रथम स्त्री बंधनमुक्त झाली पाहिजे. या विचारामुळेच एकोणिसाव्या शतकातील सुधारणेचा केंद्रबिंदू "स्त्री" होती. स्त्री ही एक शक्ती आहे. आणि धर्म, रूढी, परंपरा यांच्या अवास्तव बंधनाखाली ती शक्ती दबून गेली आहे. सत्तांध होऊन स्वार्थापोटी स्त्री ही मालकी हक्काची उपभोग्य वस्तू समजली जाऊ लागली. समाजाने स्त्रीवर गुलामगिरी लादली. जीच्या पासून नवजीवन मिळते ती शक्तीच गुलाम झाल्यामुळे तिच्या व्यक्ती विकासाबरोबरच समाजोन्नती खुरटली आणि नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक अध:पतनास सुरवात झाली. दुराग्रही वृत्तीमुळे ही अराजकता माजली होती हे स्पष्टच आहे. "विश्वाचे आदितत्व पुरुष नसून स्त्री आहे."[४]

या आदितत्वाची, व्यक्तीगत आणि सामाजिक प्रतिष्ठा वैदिक कालात यथायोग्य जोपासली गेली होती म्हणूनच वैदिक काळ हा सर्वार्थाने संपन्न होता. याची इतिहास ग्वाही देतो. रामायण महाभारतातील सर्वशक्तीमान स्त्रीयांची अवहेलना झाली तेंव्हा एकात समाज रसातळाला गेला, तर दुसऱ्यांत धर्मयुध्द घडून आले. जेंव्हा जेंव्हा तिचा आत्मसन्मान हिरावून घेऊन तिला अवमानित, करून टाकले गेले तेंव्हा तेंव्हा इथे अनर्थच घडले आहेत.

साधारण १२ व्या शतकापासून तर 'स्त्री'चे व्यक्तीस्वातंत्र्य हिरावून घेतले गेले. ती एक मालकी हक्काची वस्तू बनली. मालक तिचा काही वापर करून घेऊ लागला. बटीक, दासी, गुलाम, अबला, ही बिरुदे तिला

प्राप्त झाली. "याचे प्रमुख कारण हिंदूंची शास्त्रे आणि धर्माच्या नावा-खाली वज्रलेप बनलेल्या रूढी, हिंदूशास्त्रांनी स्त्रीवर अनन्वित बंधने लादून पुरुषाला मात्र मोकळे सोडलेले होते. आधि हिंदूंची शास्त्रे अनेक त्यात पर-स्पर एक वाक्यता नाही शिवाय सामाजिक आचारात शास्त्रात, रूढिर्बलि-यसी या तत्वाचा विशेष बडिवार, या रूढिंनी जाती बंधने निर्माण केली होती. वरिष्ठ जातीत स्त्रीयांवर विशेषत:विधवांच्या जीवनावर कडक निर्बंध घातले गेलेले होते. वरिष्ठ जातीचे कनिष्ठ जातीत अनुकरण करण्याची प्रवृत्ती होती, सती, बालविवाह, विधवा विवाहास बंदी केशवपन स्त्री शिक्षणास बंदी, जरठबाला विवाह, हुंडा, संमति वयाची समस्या, बहुपत्नी-कत्व, विषमविवाह, वारसयाचा प्रश्न, पडदापध्दती, या सर्व सामाजिक व धार्मिक रूढीचे अनर्थ कारक परिणाम प्रामुख्याने स्त्रीलाच भोगावे लागले होते. स्त्रीच्या व्यक्तीत्वाचा संपूर्ण संकोच झाला होता. संसारात पुरु-षाची अधिसत्ता होती. स्त्री ही पुरुषांची गुलाम बनली होती."[५] वरील सर्व जाचक बंधनाने पुरुषप्रधान संस्कृतीत, धर्माच्या कर्मकांण्डामुळे स्त्रीचे माहा-त्म्य, प्रतिष्ठा आणि शक्ती अशा रितीने कमकुवत आणि कमजोर केली होती. एका स्त्रीच्या हया व्यक्तीविकासाच्या आड येणाऱ्या सामाजिक बंधनांनी स्त्रीचे अवमूल्यन झाले होते. याचे भान ही समाजाला नव्हते. "स्त्री महात्म्याचे अवमुल्यन करण्याचा इतका कठोर आणि आग्रही प्रयत्न जगात अन्यत्र कोठेही झालेला आढळत नाही."[६] स्त्रीयांच्या बाबततीत इतक्या निकृष्ठ विचारसरणीत, आपला समाज स्थिर झाला होता. आणि कधीकाळी विचारांने वैभवसंपन्न असलेला आपला धर्म रूढीच्या आधीन गेल्या मुळे त्यातील विवेकी विचार प्रवाह कुंठीत झाल्या सारखा झाला होता. संपन्नावस्थेला उतरती कळा लागली. / जैन, बौध्द आणि वारकरी संप्र-दायाने आध्यात्मिक वैचारिक बैठक उज्वल केली पण ऐहिक पातळीवर मात्र सामाजिक आणि सांस्कृतिक नीतिमत्ता अत्यंत खालावली होती. या संप्रदायातही स्त्री मोक्षमार्गातली अडचण आहे तिचा सहवास पारमार्थिक जीवन असफल करण्यास कारणीभूत ठरतो. असे प्रतिपादन संतांनी केल्या-मुळे स्त्रीच्या जीवनात या संप्रदायांमुळे फारसा फरक पडला नाही. जैन-

धर्मात तिला स्वातंत्र्य मिळाले पण तिच्या महत्त्वपूर्ण अस्तित्वाची दखल समानतेच्या भूमिकेतून कधीच घेतली गेली नाही.

नवी विचार सरणी:-

अशा परिस्थितीत समुद्रपार करून आपल्या बुध्दिमत्तेवर आणि ज्ञाननिष्ठेवर अपार श्रध्दा निष्ठा असणाऱ्या इंग्रजांनी चारी बाजूने सुरक्षित समजल्या जाणाऱ्या व इतर जगातील घडामोडींशी कधीही संपर्क न आलेल्या हिंदूस्थानवर कब्जा केला. राजकीय व्यापारी दृष्टीकोनाशिवाय, जिज्ञासू इंग्रजांनी हिंदू समाजाला, त्यांच्या सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्राचा अभ्यास करून जबरदस्त वैचारिक धक्के देण्यास सुरवात केली. आपलीच विचारसरणी श्रेष्ठ, संस्कृती श्रेष्ठ, धर्म श्रेष्ठ मानणाऱ्या समाजालाही स्वतःच्या कूप - मंडूक वृत्तीची जाणीव होऊ लागली. नव्या विचारातील व्यापकता आणि विशालता त्यांना उमगू लागली आणि जीवनाच्या सर्वक्षेत्रात नव्या विचारांनी प्रवेश केला. अर्थातच त्यामुळे समाज जीवनाचे प्रतिबिंब असणाऱ्या "मराठी वैचारिक साहित्यात एका नव्या युगाचे प्रवर्तन आले असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही."[७] महाराष्ट्रात लोकहितवादी आणि बाळशास्त्री जांभेकर यांनी नवविचारांचे मूल्य प्रथम समाजाच्या निदर्शनास आणून दिले व नवजीवनवादी ( Renaissance) चळवळ सुरू केली. ती समाज जीवनात रुजविण्याचा प्रयत्न केला.

नियतकालीकांच्या माध्यमातूनही जे समाजपरिवर्तनाचे कार्य सुरु झाले त्यांत प्रथम स्त्रीयांच्या खालावलेल्या जीवनमानाचा विचार मांडला गेला. स्त्रीयांना समान दर्जा दिला तरच आपली ही विपन्न अवस्था सुधारु शकेल असा निश्चयी सुर त्यांनी समाजमनात बिंबवण्याचा प्रयत्न केला.

जीवनाच्या कुठल्याही अंगाचा विचार स्त्रीच्या शक्तीशाली सामर्थ्यावर आधारलेला आहे. तिची वृध्दी अभिप्रेत असेल तर समाजाने तिच्या निःसार करून टाकलेल्या जीवनाकडे डोळसपणे बघावे. असे उघड उघड आवाहन केले. लोकहितवादींच्या विचारसरणींत "मतार्थ झालेल्या स्त्रीला -

धिःकार आहे. स्त्री-पुरुष समानतेची घोषणा आहे."[८] आगरकर न्या. रानडे, फुल्यांनी पुढे याच वैचारिक बैठकीचा पुरस्कार केला आणि स्त्रीजीवनात बदल घडून येऊ लागला.

स्त्रीजीवनाशी संबंधीत बालविवाह, पुनर्विवाहास बंदी, विधवेचा-छळ, बालाजरठविवाह, या घातकी व समाजोन्नतीला किड लागणा-या विचारसरणीवर सतत आघात केले जाऊ लागले व परंपरेने रूढीच्या दलदलीत अडकलेल्या स्त्रीला दलदलीतून बाहेर काढण्याचे मार्ग शोधले जाऊ लागले.

धर्मदेश जाती भेद नाही जिला
शोभे मनुजाला। खरी माता
अशा मानवीत सत्स्त्री म्हणावी
तिची किर्ती गावी ज्योति म्हणे"[९]

अशी आदरयुक्त भावना समाजमनात निर्माण करण्याचा प्रयत्न होऊ लागला आजवर स्त्रीकडे बघणारांना ती उपभोग्य वस्तू म्हणून बघितले जात होते. त्याचे रूपांतर स्त्रीकडे माणूस म्हणून बघण्यास होऊ लागले.

## स्त्रीयांच्या दुःखाकडे समाजाचे लक्ष वेधणारे वाङमय :-

समाजात घडणा-या घडामोडीचे प्रतिसाद पर्यायाने तत्कालीन वाङमयात पडतात. म्हणून साहित्य आणि समाजाचा अत्यंत निकटचा संबंध आहे."साहित्य हा समाजसापेक्ष सर्जनशील आविष्कार होय. त्यात मानवी जीवनविषयक अनुभवाचा म्हणजेच जीवनाच्या मूल्याचा वेध घेण्याचा प्रयत्न असतो. जीवनविषयक प्रेरणांनीच साहित्य रूपास आलेले असते".[१०] इंग्रजी संस्कृतीच्या नव्या दृष्टीने, जी एक वैचारिक परिवर्तनाची प्रचंड चळवळ सुरु झाली होती अर्थात तिचे साद पडसाद तत्कालीन वाङमयावर पडणे अपरिहार्यच होते.

प्रबोधन काळात पुरोगामी आणि प्रतिगामी विचारांची लढत असते. त्यांच्यात मतभेद असतात. स्त्रीशिक्षण, बालविवाहाची चाल बंद

करावी अशी मागणी, स्त्रीला पुनर्विवाहाला संमती द्यावी, केशवपन ही रूढी धर्माधिष्ठीत नाही, विषमविवाह करू नयेत असे सांगून त्यांची अभ्यास पूर्वक दिलेली कारणमीमांसा पुरोगामी लोकांना पटत नव्हती आणि मग इथूनच मतभेदाला सुरवात झाली. वरील कारणांनी स्त्रियांच्या खालावलेल्या जीवनमानाचे अवलोकन करतांना अर्थात अनेक मतभेद झाले व त्याचे अनुकूल, प्रतिकूल, वाद-प्रवाद साहित्यातही उमटले.

बाबा पदमनजीची यमुनापर्यटन ही कादंबरी विधवांच्या समस्यांना वाचा फोडणारी होती, १८५६ मध्ये विधवा विवाहाचा कायदा पास झाला होता. १८५७ मध्ये ही कादंबरी लिहिली गेली. विधवांचे आंतरिक दु:ख, त्यांची समाजाने चालविलेली दुर्गती, व्यभिचाराला मिळालेला वाव, त्याचे निर्मूलन व्हावे याच सदिच्छेने ही कादंबरी लिहिली गेली. दादोबा पांडूरंगांनी "विधवाश्रुमार्जन" हा संस्कृत निबंध मराठी भाषांतरासहित या कादंबरी बरोबर प्रसिध्द केला. "पण लक्षात कोण घेतो" हयातही हरीभाऊंनी समाजाच्या निष्ठूरमनालाही पाझर फोडील असे विधवेचे दु:ख वर्णिले आहे. ही समाजजीवनातील वास्तवता होती. "वास्तवात परिवर्तन घडविण्याचा संदेशही त्यांनी साहित्यातून दिला."[११] आणि समाजाच्या बोथट झालेल्या जाणीवा जागृत करण्याचा उद्देश यथाशक्ती दर्शविला . "शारदा" नाटकातून देवलांनी विषमविवाहावर मार्मिक बोट ठेवले आणि म्हातारा आणि बालिका यांच्यातल्या वयाच्या विलक्षण अंतराने काय होते हे समाजाच्या निदर्शनास आणून दिले.

नाटक, काव्य, कथा, कादंबरी, निबंध या सर्वांच्या समावेशासहित नियतकालिकांनी वैचारिक साहित्याला प्राधान्य दिले. नियतकालिकातून प्रसिध्द होणारे लेख विचारजागृतीचे कार्य करीत व त्यादृष्टीने ते संग्रहित व संपादित केले जात. म्हणूनच इंग्रजी राजवटीच्या सुरवातीला विचार प्रचाराचे कार्य बहुतांशी नियतकालिकांच्या माध्यमातून झाले. "नियतकालिकांचा संभव त्यांच्या व्दारे झालेली विचार जागृती आणि विचार संघर्ष आणि त्यातून वाङ्मय निर्मिती अशी ही परंपरा आहे."[१२]

महाराष्ट्राच्या वृत्तपत्राच्या इतिहासात विविधज्ञान विस्तार हे नियतकालिक दीर्घायुष्यी आहे त्यामुळे समाज स्थित्यंतरातील सर्व घटनांशी त्याचा जास्त संबंध आहे. आणि म्हणूनच सुधारणेचा केंद्रबिंदू असलेल्या स्त्री जीवनावर व स्त्रियांच्या समस्येवर कोण कोणत्या दृष्टी-कोनातून विचार झाला हे बघण्यासाठीच त्यातील लेखांचा वैचारिक बैठकितून उहापोह करावयाचा आहे.

विविधज्ञान विस्ताराचे वैशिष्ट्य:-

विविधज्ञान विस्ताराचे दीर्घायुष्यी कार्य निश्चितच अभ्यास करण्यासारखे आहे. राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व वाङ्मयीन दृष्टीकोनातून यात सडेतोड व नि:पक्षपाती पणाने विचार झाला आहे. विशेषे करून स्त्रियास उपयुक्त अशी प्रतिज्ञा करून आपले स्त्री जीवनाच्या उध्दाराचे उद्दिष्ट अनुकूल-प्रतिकूल लेख प्रकाशित करून संपादकाने साधले आहे. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, स्त्रीपुरुषसमानता, केशवपन, बालविवाह,इतर घातकी रुढी चालीरिती या सर्वांचा उहापोह केला आहे. "अनेक विद्यामूल तत्व संग्रह" हा ग्रंथ चिपळूणकरांनी लिहिला तद्वत विविधज्ञानविस्ताराने नावाप्रमाणे अनेक विद्यांचा प्रसार व संग्रह केला. कथा, काव्य, भाषाशास्त्र व्याकरण समीक्षणात्मक लेख, चरित्र आत्मचरित्र, भाषणाचे संकलन, स्फुट लेखन या सर्व वाङ्मयाला उत्तेजन देऊन तत्कालिन सामाजिक प्रश्नावर ही योग्य तो प्रकाशझोत टाकला आहे.

या नियतकालिकांला एक प्रकारची सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. अर्थातच याचे श्रेय त्याचे संपादक रा. भी. गुंजीकर यांना जाते. ते सुरवातीला सहा सात वर्ष जरी संपादक म्हणून काम करीत होते. तरी त्यांनी त्याची वाङ्मयीन व वैचारिक पातळी सुरवातीपासूनच दर्जेदार ठेवली होती. आजही त्यातील वैचारिक ठेवा सुध्दा वाङमयीन अभिरुचीने अभ्यासणे हिताचे ठरेल. कारण त्यातील विचार सामर्थ्याचे अवलोकन व आकलनाची नितांत गरज आहे. दूरगामी दृष्टीने निर्माण झालेले साहित्य

पुनर्मूल्य-मापनाने पून्हा समाजापुढे येते. त्याच उद्देशाने त्याची वैशिष्ठ्य पूर्ण कामगिरी बघून, त्यातील "स्त्रीविषय लेखांचा" वैचारिक पातळीवर अभ्यास करावयाचा आहे. स्त्रीसमस्या, स्त्रीसमस्यांची उकल करण्याचा प्रयत्न, स्त्रीविषयक दृष्टीकोनात समाजात झालेला बदल, सनातनीयांच्या आणि सुधारकांच्या दृष्टीतील स्त्रीजीवन, स्त्रीशिक्षणाच्या विचारांमुळे समाजमनात सुरु झालेले आंदोलन, एकंदर स्त्रीच्या व्यक्तीस्वातंत्र्याच्या विचारा मागील सनातनी आणि सुधारकांच्या दृष्टीपुढे असलेली विचारांची तात्वीक बैठक तत्कालीन विचारसरणीच्या मूल्यावर तपासून बघावयाची आहे. व आजही त्याचे पडसाद स्त्री जीवनावर कसे पडतात याचे अवलोकन करावयाचे आहे.

## स्त्रीविषयक लेखातील लेखकांची भूमिका:-

कैक शतकापासून स्त्रि.यांनी अनन्वीत हाल अपेष्टा मूकपणे सहन करीत आपले आयुष्य घालविले आहे. आणि तिच्या या मूकपणाने जुलूम, जबरदस्ती करुन तिला रुढी नियमांनी ग्रासून टाकण्याचे व्यसन समाजाला जडले होते. संबंध भारतभर या मूकेपणाला विचारवंतांनी बोलके बनविण्याचा प्रयत्न सुरु केला होता. "भारतीयमन कैक शतकानंतर जुनी चाकोरी सोडून नव्या वैचारिक वाटांनी जाण्याचा प्रयत्न करीत होते. राजकीय पारतंत्र्यामुळे उत्पन्न झालेला न्यूनगंड, राज्यकर्त्यांचे कर्तृत्व, प्रगतिशास्त्र, कला यातील नैपुण्य पाहून दिपून गेलेले डोळे, चिरनिद्रित समाजाला जागृत करणे."[१३] हा या काळातील लेखनाचा एकमेव हेतू होता.

विद्याबुध्दी बरोबरच भावनेलाही आव्हान दिले जात होते. जनसमाजात घट्ट रुतून बसलेली धर्माधिष्ठीत संस्कृति ही मूळच्या पावित्र्यापासून दूर गेल्यामुळे त्यात विकृती निर्माण झाली होती. ती घालविणे ही काळाची गरज होती, व त्यादृष्टीने जनजागृती करणे हे विचारवंत स्वत:चे नैतिक कर्तव्य समजत होते. ते कर्तव्य स्वदेश प्रेम व स्वबांधवांच्या प्रेमामुळेच निर्माण झाले होते. "धर्म म्हणजे निर्बुध्द आचारांचा किंवा रिकामटेकड्या बुध्दीचा खेळ नव्हे."[१४]

असे आत्मविश्वासाने प्रतिपादन केले जाऊ लागले. धर्मग्रंथाना प्रमाण मानून प्रचलित झालेले नियम कालमानाने बदलावे लागतात तरच समाजाची सांस्कृतिक जडणघडण आदर्श बनते. तसे झाल्यामुळे "नव्या परिस्थितीतील नवे अनुभव मनुष्यांना जुन्या संस्थात बदल करण्यास किंवा त्याचा नाश करण्यास प्रवृत्त करतात. ही बदल करण्याची किंवा नष्ट करण्याची वृत्ती बुध्दिजन्य असते." १५ या बुध्दीवादी विचार सरणीतूनच स्त्रीची नगण्यता, दूर करण्याचा संकल्प केला गेला. व तिच्यावरील अन्यायाचे, जुलमाचे सावट दूर करण्याचे प्रयत्न होऊ लागले.

लहानवयात मुलीचे लग्न नको, त्यामुळे तिची मानसिक अवस्था अविकसितच राहते. शरीर दूर्बल बनते, जिज्ञासूवृत्ती नष्ट होते, आणि फुलण्याआधीच करपून गेलेले तिचे जीवन सामाजिक कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ ठरते. म्हणून विवाहाची मर्यादा वाढविली जावी.

वैधव्य हा प्रारब्धाचा भाग असला तरी, वैधव्यप्राप्त झालेली स्त्री जीवंतपणी मृतावस्थेत आपले आयुष्य घालविते व रुढीच्या अंधारकोठडीत बंदीस्त केली जाते. व्यक्ती म्हणून तिची अस्मिता, तिचे अस्तित्व, तिच्या जाणाते, अजाणातेपणी पतिच्या चितेबरोबरच जळून खाक होते. मग अशी स्त्री, आपली संस्कृति कशी जोपासणार त्यासाठी तिला व्यक्तीगत विकासाचा फार मोठा अडसर आहे. तो दूर व्हावा व समाजाने यासाठी पुढाकार घ्यावा.

केशवपन करुन, बालिका असो, प्रौढ असो, तिला विद्रुप करुन टाकायची, ज्या सौंदर्यामूळे तिचे स्त्रीत्व विलोभनिय दिसते, त्याचाच समूळ नायनाट करायचा आणि तिच्या भावनांवर अघात करायचा, त्यामुळे ती समाज जीवना पासून संपूर्ण तोडली जाते. मग "स्व" पासून दूर गेलेली स्त्री स्वराष्ट्र, स्वबांधव, स्वदेश याचे मर्म काय जाणणार. तेंव्हा अशा हीनवृत्तीच्या चालीरीती संपूर्णपणे बंद व्हाव्यात..

"मुरळी बनविलेल्या स्त्रीची देवाला, खंडोबाला आहुति दिली जाते आणि व्यभिचाराचे व्दार धर्म आणि देवाच्या नावाखाली खुले केले जाते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR.

ज्या स्त्रीने नवीन सुदृढ जीवन समाजाला देऊन आपली सामाजिक नैतिक, राष्ट्रीय, जबाबदारी पार पाडण्याचे महत्वपूर्ण काम करायचे, त्याच स्त्रीची अशी दुर्दशा केल्यावर समाज कसा उन्नती पथावर गेलेला दिसेल ? प्रत्यक्ष हाल सहन करणारी स्त्री धर्म, धार्मिक नियम, परंपरा, रुढी, रीतिरिवाज यातील वस्तुस्थिती, अज्ञानामुळे जाणून घेण्यास असमर्थ आहे. व या अज्ञानाने तिची प्रतिकार शक्ती संपूर्णपणे नष्ट झाली आहे. ती जागृत करण्याची नितांत गरज आहे. तिला शिक्षण देऊन तिचा वैयक्तीक आत्मविश्वास, तिची कौटुंबिक, सामाजिक प्रतिष्ठा, तिचे अधिकार आणि कर्तव्य, तिची जबाबदारी, तिची सामाजिक बांधीलकी, तिला शिक्षण देऊन समजावून सांगण्याची आवश्यकता होती. कारण स्त्रियांवरील हे जुलूम जरी समाजात रूजून बसले होते दुर्लक्षित झालेले होते तरी त्यातच सामाजिक अवन्नतिची पाळे मूळे रोवली गेलेली होती.

हयाच विचारातून, हयाच भूमिकेतून आपली मर्यादा उल्लंघन न करता, आपले स्त्रीत्व जतन करून आत्मविश्वासाने अन्यायाचा प्रतिकार करणारी, आपली जुन्या सद्‌विचारांवर कलम होत असलेली नवी विचारसरणी पेलणारी, कौटुंबिक स्वास्थ्य अबाधित ठेवणारी, पण स्वतःचा बौध्दीक विकास स्वसामर्थ्याने वाढविणारी, सुशिक्षित, स्त्री, व्यक्तीस्वातंत्र्याचा गैरफायदा न घेणारी, जागृत स्त्रीची शक्ती संघटित करून सुशिक्षित स्त्री घडविण्याचा प्रयत्न यातील लेखातून लेखकांनी केला आहे हे दिसून येते.

पा. दा. गुणे, गो. म. चिपळूणकर, रा. भी. गुंजीकर, वा. ना. देव, सौ कमळाबाई किबे, सौ. काशीताई कानिटकर, विष्णू परशूराम पंडीत व तत्कालीन स्त्री विषयक साहित्याचे परिक्षण लिहून स्त्रीच्या सर्वांगीण जीवनाची अवकळा घालवून तिच्यात चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न व्यासंगी, जाणकार, बहुश्रुत लेखकांनी केला आहे. या सर्व विवेचनावरून स्त्री विषयक लेखातील लेखकांची भूमिका स्पष्ट होते.

## स्त्री जीवनावरील लेखांचा परामर्श:-

माणसाच्या जीवनात स्त्रीयांचे महत्व अनन्यसाधारण आहे. कारण स्त्रीही सर्जनशील आणि सृजनशील शक्ती आहे. म्हणून आजपर्यंत जी संस्कृति आपण जोपासली जतन केली असे म्हणतो त्यात स्त्रीचाही वाटा महत्त्वपूर्ण आहे. पण पौरूषावर अवलंबून असलेल्या "अबला" म्हणविणाऱ्या स्त्रीला, याची यथार्थ जाणीव नव्हती कारण ती सर्वार्थाने दुबळी समजली जात होती. समाजाने तिचे विश्व संकुचित करून टाकले होते. मर्यादित करून टाकले होते.

Man's problem is his relationship to the universe, woman's they suggest, her relationship to the man.:१६

या मर्यादित विश्वामुळेच तिचे व्यक्तीमत्व खुरटून गेले होते.

या मर्यादित विश्वाला व्यापकता आणण्याचे कार्य या लेखांतून होत होते. स्त्रीला शिक्षण देणे अगत्याचे समजले गेले होते. तिचा व्यक्ती विकास साधण्यासाठी शिक्षणाशिवाय अन्यमार्ग नाही ही एक भूमिका होती.

या विचारांना कडाडून विरोध करणारा एक विचार प्रवाह निर्माण झाला होता. स्त्रीने घराच्या चारभींतीत, उंबऱ्याच्या आत पूजाअर्चा, सणवार, व्रतवैकल्य करीत रहावे, हेच तिच्या आयुष्याचेअितिकर्तव्य, असा दुराग्रही विचार करणारा समाज, स्त्रियांना शिक्षण देण्याच्या विचाराला निकराचा विरोध करीत होता. मुली, स्त्रिया वाचू लिहू लागल्या तर त्या स्वैराचारी होतील, विधवा स्त्रीचे लग्न केले तर ईश्वरी कोप होतील, असे अज्ञानमूलक अपसमज जनमानसात प्रचलित होते. या विचारसरणीचा दुसरा गट या लेखातून स्पष्ट दिसतो.

नव्याजुन्या विचार सरणीतील समन्वयवादी भूमिका घेणारा तिसरा गटही इथे निर्माण झालेला होता. "स्त्री" ला शिक्षण द्यावे, तिला जाचक बंधनातून सोडवावे, व तिला स्वतःचा विकास करण्यास मदत करावी पण स्त्री शिक्षणामुळे आणि व्यक्तीस्वातंत्र्याच्या संधीमुळे काही

संभाव्य धोके निर्माण होण्याची शक्यता वाटत असल्यामुळे विद्यमानस्थिती-तल्या विचारांचा तिसरा गट स्त्री शिक्षणाला गृहशिक्षण आणि कुटुंब-व्यवस्था या विषयापुरते सिमित करणाऱ्या विचारसरणीचा होता.

अशा प्रकारे उलट सुलट प्रतिक्रिया, पुनरुज्जीवनवादी, पुरोगामी व सनातनी यांची सुधारित आवृत्ति या तीन गटातून व्यक्त होऊ लागली.

बालविवाह, स्त्रियांचा पुनरुध्दार, स्त्रीजीवनावर प्रकाश (दोन लेख) समाजजीवन, समाजचित्र, स्त्रियांचे अधिकार, स्त्रीशिक्षणाचे ध्येय व दिशा, स्त्रियांचे पारमार्थिक अधिकार, पुस्तक परिक्षा, स्त्रीशिक्षणाची वाटचाल, स्त्रियांवरील जुलमांचा निषेध करणारी भाषणे, माता व तिची कर्तव्ये, आईची थोरवी, युवतीरत्नमाला, पुनर्विवाहा विषयीची मते, खरे प्रेम, संवाद, सुगृहिणी, स्त्रियांसाठी पंचरत्नमाला, माता आणि बालक, कुटूंबसुख, गुणवती स्त्री, कर्तबगार स्त्रियांची चरित्रे, पुष्पकरंडक पुस्तकावरील समीक्षणात्मक लेख, स्त्रियांचे तेज, कन्याविक्रय, मुरळ्यांचा प्रश्न व इतर चालू असलेल्या घडामोडीतून स्त्री जीवन, अशा लेखातून, स्त्री विषयक दृष्टीकोनाचे कंगोरे उकलवून दाखवून, सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखविली आहे.

पुरुषांचा स्त्री जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन, स्त्रियांची बद-लणारी स्थिती, त्यांच्यातील मतैक्य आणि मतभेद या सर्वातील दुवे जोडून त्यातील वैचारिकता अजमावयाची आहे.

स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाचे स्वरूप:-

कुठल्याही क्षेत्रात सुधारणा घडून येणे म्हणजे कांही सहज सुलभ गोष्ट नाही. गतानुगतिक अंगापिंडात भिनलेल्या अपप्रवृत्तींचा नाश करण्यासाठी त्या अपप्रवृत्तींवर सातत्याने प्रहार, आघात करावे लागतात वैदिक काळाच्या संपन्नावस्थेचा -हास होऊन माणसाची प्रवृत्ती सत्ता-पिपासू होऊ लागली तसतशी स्त्रीकडे बघण्याची दृष्टी संकुचित होत गेली.

आणि सतराव्या अठराव्या शतकात या संकुचित वृत्तीने टोक गाठले होते. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक ही -हासाची नांदी असते. सुधारणेची प्रस्तापना असते.

रूढी परंपरेत रूजून बसलेली मने सुधारणावादी विचारांना थोतांडाचे स्वरूप देऊ लागली. स्वत:स्त्रीसुध्दा या सुधारणेला सहमत नव्हती. धार्मिक, सामाजिक,थोतांड हेच वास्तव ठरले होते. आजही हया स्थितीत फारसा फरक पडलेला दिसत नाही. आपली प्रतिष्ठा, आपला आत्मसंन्मान, आपली अस्मिता आपण प्रयत्न पूर्वक पून्हा मिळवावी असे बहुतेक स्त्रियांना अजूनही वाटत नव्हते. त्यामुळे बलशाली समजला जाणारा पुरूषाने "ईश्वराने स्त्री हे एक आपणास दोन पायाचे व बोलते जनावर कष्ट मशा-लत करण्यास दिले आहे."[१७] असा पक्का समज करून बसले होते. आणि तिचे मूकपण या गुलामीवृत्तीची शक्ती कळत नकळत वाढवित होते. गुलाम होऊन राहणारी एक शक्ती हया सुधारणेमुळे जर आपल्यापासून दूर गेली किंवा अन्यायाचा प्रतिकार करू लागली, तर आपली सत्ता संपुष्टात येईल हया भितीमुळे सुधारणेला विरोध होऊ लागला. म्हणून चार भिंतीच्या आड रूढी, परंपरेच्या शृंखलात अज्ञानमूलक धार्मिक भाव पूजत बसलेली स्त्री म्हणजे स्त्री जीवनाचे खरे सार्थक, पातिव्रत्य हा तिचा अलंकार सद्वर्तन सद्शिलता, चारित्र्यसंपन्नता, व समर्पणाची पराकोटीची, टोकाची भूमिका हे तिच्या जीवनाचे सार ठरले. विशिष्ट चौकटीच्या क्षेत्रात दाबून दुबून बसविलेली तिची ही एक प्रतिमा. पति व पत्नी आणि माता व बालक, सुगृहिणी, या क्षेत्रात तिच्या अजाणतेपणातच, माहे-रच्या चौकटीतून सासर नावाच्या चौकटीत तिचे स्थलांतर आणि तिथे मनमानेल तसा तिचा होणारा छळ, मर्यादा, चारित्र्य, कुल, शिल, या भारदस्त शाब्दिक भावनाने तिला जखडले जाऊन संसार वेदीवर तिचा बळी दिला जातो. याचे कारण एकच तिचे अज्ञान व अबलत्वा खाली दबलेले तिचे मन.

म्हणूनच कृपाबाई सत्यनाथनबाई आपल्या सगुणा या कादंबरीत म्हणतात

"Poor girls ! what can we expect from such stunted impoverished mind There mothers are no better and their fathers have very little to do with them. Their starved minds have nothing to feed."१८

अज्ञानत्व हे प्रमुख कारण, जाचक रुढींना मूकपणे जपण्याच्या पलिकडे तिची कांही, बौध्दिक, भावनिक, भूक आहे याची तिला जाणीवच नव्हती. तिच्यातिल ज्ञानपिपासूवृत्ती, खुरटून गेली होती. तिला टवटवीत करुन फुलविण्याची पोक्त जबाबदारी समाजाची होती. स्त्रियांवर होणा-या अन्यायाचे स्वरुप आणि त्याचे परिणाम बघणे आवश्यक होते. खरे प्रेम, समाजचित्र, बालविवाहाचा अनुभव, बालविवाह, पत्नी या लेखातून हे स्वरुप स्पष्ट होते.

बाल विवाह व त्याचे अनर्थ:-

दोन भिन्न कुटूंबांचा लग्नबंधनाच्या संस्कारातून संबंध येणे, त्यातून संस्कारांची देवाण घेवाण करणे व नवनिर्मितीच्या सहाय्याने सामाजिक संस्कृति जोपासणे हा उदात्त हेतू लग्न बंधनामागे अभिप्रेत आहे. पण आपण त्या उदात्त हेतूचा विपर्यास केला होता. छोटी बालिका आणि पोक्त वयस्कर माणूस, सगळ्यांच बाबतीत विसंगतीच रुप धारण करुन हा लग्न सोहळा होऊ लागला. मुलगी कितीही लहान असली, असंमजस असली, पति; संसार या शब्दांना अपरिचित असली तरी ही या बंधनाचे "जू" तिच्या कोवळ्या मानेवर ठेवले जाऊन तिच्या आयुष्याची फरफट होण्यास प्रारंभ होई. त्या अजाण, अश्राप बालिकेने "सृष्टी नियमाप्रमाणे व धर्मशास्त्रा प्रमाणे तिने नव-याच्या सुखदु:खाचा वाटा घेतलाच पाहिजे."२० तिच्या बालमनाला संपूर्णपणे आनोळखी विश्वाशी समरस होण्याची कुवत नसूनही तिच्यावर हा संसार लादला जातो. बालमनाची विलक्षण कुंचंबणा होते. याची जाणीव छोटया बालिकेला जाणवते. तेंव्हा "बायकांच्या विचारांची केवढी थोरली ही मुस्कटदाबी २०

हाच विचार तिच्या मनात प्रश्नाचे वादळ उठवतो.

बाल्य हिसकावून घेतले जाते, पौगंडावस्था, अकाली आलेल्या पोक्त पणाने वाकून जाते, यौवनाचा अर्थ समजायच्या आत, ते करपून गेलेले असते. "या संबंधात न्याय मागावयास गेल्यास जुलमी अधिकारी मंडळ, म्हणजे घरची वडील माणसेच होत. त्यांच्या जवळ न्याय मागण्यांत अन्यायच अधिक घडतो."[२१]

ही वास्तवता स्त्रियांना समजू लागली होती बालविवाह ही जीवन फुलविणारी घटना नसून जीवन उदास भकास करणारी विलक्षण घटना आहे पण याचा जाब सुध्दा विचारता येत नाही. कारण जुलूम करणारे अधिकारी जाब विचारायला जाताच अजून अन्याय आपल्यावर करतील ही खात्री. ज्या मूलीने भातूकली खेळायची, निसर्गाच्या सान्नीध्यात, आत्मीयतेच्या, प्रेमाच्या विश्वात रममाण होऊन, स्वत:चा विकास करायचा त्या कोवळ्या वयात तिच्यावर संसार लादूनच आपला समाज थांबत नाहीतर, शरीरसंबंधाचे दडपणही त्यांच्यावर लादले जाते.

वास्तविक पाहता हा सुध्दा एक प्रकारचा व्यभिचारच आहे. व तो व्यभिचार धर्म संमत मानून समाज त्याची अंमलबजावणी सरधोपटपणे करीत आहे. मानसिक, शारिरीक, बौध्दीक वाढीवर याचा अतिशय वाईट परिणाम होणे साहजिकच आहे. "अल्पवयात म्हातारपणासारखी झालेली बापूडवाणी स्थिति पाहून तुम्हापैकी कोणास बरे सांगा पाहू आपल्या अविचारी कृतिचे स्मरण होत नाही व आपण स्वत: त्यांच्या नाशास कारण झालो असून त्यांच्या कडून सर्वस्वी दोष लावले जाण्यास पात्र झालो आहे अशी कल्पना कोणाला बरे कधीच मनात येत नाही."[२२]

असा तत्य व परखड सवाल डॉ. पेंची पेप्सिन बाईंनी "बालविवाह हाच्या" घातकी चालीवर भाषण करतांना विचारला आहे. विवाह संस्था ही व्यक्तीगत सुखासाठी नसून बलशाली आणि सामर्थ्यसंपन्न अशा राष्ट्राच्या उभारणीचा, घडणाघडणीचा तो एकमेव आधार आहे. आरोग्यदायी समाजाची ती धुरा आहे. शुध्द आचारविचारांचा तो पिंड आहे. आणि नंतर

व्यक्तिगत सुखाची बाब आहे. व्यक्तीगत सुखातून जर राष्ट्र उभारणीचे एवढे महान कार्य होते. तर अशा कार्याला बालविवाहाच्या अनिष्ठ रूढीने कीड लावण्यात काय अर्थ आहे.

धर्म जीवनाला पोषक असतो तारक असतो. मारक नसतो. इथे मात्र धर्माच्या नावावर अनेक अश्राप अजाण मुलींचे जीवन क्षणार्धात धुळीस मिळविले जाते व सामाजिक अवन्नतिबरोबर राष्ट्राचीही अवन्नती केली जाते. पण आपला समाज आहे त्या विचारांच्या वलयात गुरफटून गेला असल्याने इष्ट अनिष्ट चांगले वाईट, हितकारी-अहितकारी विचार करण्याची त्यांची कुवतच जणू खोटया अहंपणाने कोलमंडून पडली होती. "स्वतंत्रपणे विचार करून तद्नुसार वर्तन करण्यास लागणाऱ्या धैर्याने ज्या आम्हास अनेक शतके सोडले आहे. त्या आम्हास व अन्य रूढीच्या अमलाविरुध्द बंड करून दास्य शृंखला झुगारून देण्याची व उभय सुखातील महदन्तराचा विचार करण्याची हिम्मत कोठून असणार ? कोणी लोकापवादाला भिऊन, कोणी धर्माला भिऊन कोणी अज्ञानामुळे, कोणी स्वल्प अशा वर्तमानहिताच्या आशेने कोणी मूर्ख लोकांकडून बरे म्हणवून घेण्यासाठी व कोणी यत्किंचित स्वार्थासाठी म्हणून कोणत्यातरी सबबीने आम्ही आपल्या पोरांचे जीवित निःसार करीत आहोत भावी संततीच्या दुःसह विपत्तीचा पाया घालीत आहे व दारिद्र्य बुध्दीमांध, दौर्बल्य आणि पारतंत्र्य यांच्या पेकात या भरत खंडास अधिकाधिक शोषत आहेत."[२३] ✱ बालविवाहामुळे होणारी हानी डोळे उघडे ठेवून बघत आहोत. लहान मुलींना त्यांच्या निष्पाप, खेळकर विश्वाला पारखे करून टाकले जात आहे. यातील भावनेचा भाग सोडला तरी, बालविवाहामुळे स्त्री विकलांग झाली होती. जीवनाचा गाडा एकाच चाकावर रखडत चालला होता.

भावी राष्ट्रातील अपत्ये, मन, बुध्दीने अविकसित अवस्थेत जन्माला येत होती. ही वास्तवता होती. बलशाली, सुदृढ व सामर्थ्यसंपन्न अशा राष्ट्राचा पाया म्हणजे विवाह पण यातून रोगट, पिंगट, कमकुवत, अशक्त संतती निर्माण होऊ लागली पण स्वार्थांध आणि अधिकार गाजविण्याच्या आदी बनून राहिलेला समाज या हानी कडे दुर्लक्ष करू लागला..

त्यापूढे देशहित राष्ट्रहित ही दुर्लक्षित झाले. 'सुसंवाद' बालविवाह' ह्या लेखात कमलाबाई किर्बेनी सूझ सरस्वतीबाई कडून या प्रश्नास वाचा फोडली आहे. व स्त्रियांची मानसिक कुंचबणा कशा प्रकारची असते व त्याचे अनिष्ठ परिणाम कसे घातक असतात हे अभ्यासू वृत्तीतून दाखवून दिले आहे.

## बालविवाहाचे शास्त्रीय दुष्परिणाम:-

बाल विवाह या शब्दावरूनच विवाहाची वयोमर्यादा समजून येते. चारपाच, वर्षाची मुलगी होताच तिचा विवाह करून टाकणे ही पालकांची जबाबदारी आणि ऋतुदर्शनापूर्वी किंवा ऋतुदर्शन होताच त्या मुलीला प्रौढ समजून तिचा शरीरसंबंध घडवून आणणेहे कर्तव्य "ऋतुदर्शन व संभोगावस्था ह्या एकाच अर्थाच्या वाचक अशा संज्ञा नसून ह्या दोन निनिराळ्या अवस्था आहेत. व ह्या निरनिराळ्या काळी कांही वर्षाच्या अंतराने प्राप्त होतात. पहिल्या स्थितीत संतती होण्याचा केवळ संभव असतो अशी योग्यता अंगी येते."[२४] ऋतुदर्शना नंतर दोन ते चार वर्षाचा संभाव्य कालावधी जाऊ न दिल्यामुळे त्या पूर्वीच शरीरसंबंध आल्यामुळे अपिकसित अवस्थेत ती गर्भवती राहते. त्यामुळे जन्मणारे मूल सुदृढ नसते किंबहुना या दुष्परिणामासव "अल्पवयातच स्त्रियांना मूल झाल्यामुळे त्यांची पक्व दशेस न आलेली जननेंद्रिये इतकी कांही प्रसवकालाच्या त्रासांनी मूल बहूधा गर्भातच मेलेले असल्यामुळे बिघडून गेलेली असतात. की ती पुढे गर्भधारणा करण्यास असमर्थ असतात."[२५] हाही परिणाम होतो. स्त्रीला प्राप्त होणारे मातृपद हे तिच्या वात्सल्याचे प्रतिक असले तरी राष्ट्राचा तो ठेवा असतो. हे मातृपद तिला सहजासहजी प्राप्त होत नाही. त्यासाठी असहाय्य वेदनांना सामोरे जावे लागते. पण तिच्या या सर्जनशिलतेच्या नैसर्गिक कृतीवरही, धर्मरुढीनी कब्जा केला असल्यामुळे ती याही क्षेत्रात अपयशी ठरते.

१) बालविवाहामुळे त्या बालिकेच्या मनात "विषयाची" घृणा निर्माण होते.

२) लवकर शरीर संबंध आल्याने, त्या मुलीत संततीचा अभाव दिसून येतो किंवा संतती, अशक्त, रोगीष्ट निपजते.

३) तिच्यातील शारिरीक अविकसतेमुळे गर्भधारणा शक्ती राहात नाही.
४) अशी संतती अल्पवयी असण्याचा संभव असतो.
५) किंवा लहानवयात संतती झाल्यामुळे स्त्रीचा जीव दगावण्याची शक्यता नाकारता येत नाही.
६) शिवाय "भरतखंड, कायाहीन, व्याधीग्रस्त, कुरूप, अशा लोकांची संख्या तर दिवसेंदिवस तुम्हामध्ये वाढत आहे व या सर्व गोष्टी तिचा घातकीपणा व्यक्त करीत आहे."[२५]

धर्मावर नितांत श्रध्दा असणा-या आपल्या समाजात धर्माच्या नावाखालीच ही वृत्ती पोसली जात होती. पीच फिप्सीन बाईच्या भाषणाचा समावेश या लोकांच्यात विवेक निर्माण होऊन आपण ज्या रूढीला जोपासतोय ती आपला विनाश करणारी आहे. हे समजण्यासाठीच केलेले आहे. त्याबरोबरच पाश्चात्य उदारमतवादी, जिज्ञासू, भूतदयावादी, मनाचा कंगोरा इथे दिसून येतो. आपल्या ठायींच्या विकृतीचा स्पष्ट उल्लेख भाषणात फिप्सनबाई करतात व आपली क्रूरता निदर्शनास आणून देतात. "सद्गृहस्थहो जनावरांच्या ठिकाणी देखील तुमची दयार्द्रबुध्द फार दिसून येते परंतू तुमच्या स्त्रिया व तुमची मुले यांचा तुम्ही केवळ संहार मांडला आहे. असे म्हणणे प्राप्त होते. तुमच्या पायी तुमच्या स्त्रियांना असह्य अशी दु:खे प्राप्त होतात व त्या अकाली मृत्यूच्या स्वाधीन होतात किंवा यावज्जन्म दु:खात रेंगाळतात ही तुमची स्थितीतर फारच भयंकर आहे."[२६]
या दु:स्थितीमुळेच कायम पारतंत्र्याच्या बेडया आपल्या पायात अडकवल्या गेल्या आहेत याचा विचार करून या प्रथेला आपल्यातून कायमचे घालवून देणे हीच आपली धार्मिक व सांस्कृतिक पातळी विवेकाने उंचावायची वेळ आहे.

दुराग्रही वृत्तीचा अवलंब करून ही प्रथा चालू ठेवण्याचा अट्टाहास आपण करणे हे कोणत्याही परिस्थितीत उचित नव्हते, त्याचे वाईट परिणामच भोगावे लागत होते. रोगीष्ट संततीचा देश नको असेल तर सर्वार्थाने "लवकर लग्न न केल्याने शारीरीक -हासास थोडातरी आळा पडेल व भावी पिढीची जबाबदारी शिरावर घेण्यास भावी माता ही योग्य अधिकारी होतील."[२७]

विवाहातून निर्माण होणारे वैवाहिक संबंध, जर अशा अप-या विचारांवर उभे असतील तर तिचे स्वस्थ दुर्बल, सामर्थ्यहीनच असणार व भावी पिढीचा बौध्दीक, मानसिक, शारीरीक विकास साधणे ही अशक्य असते. "मुले होणे हे सहजकार्य आहे. परंतू त्या मुलांची वाढ करतांना अनेक सामाजिक दोषांपासून त्यांचे संरक्षण करण्याची फार मोठी जबाबदारी आपल्यावर पडत असते. त्याची स्मृति त्यांच्या पालकास रहात नाही. त्याबद्दल राहून राहून खेद वाटतो."[२८] असे विचार कमळाबाई किबेनी मांडून समाजाला विचारकरण्यासाठी जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे.

सुसंस्कार करणारी स्त्री, कुटूंबाचे सत्वसंवर्धन करणारी स्त्री, अपत्याचे संगोपन करुन त्याची वैचारिकता आणि बुध्दीमत्ता वाढविणारी स्त्रीचा जर मुळात अशी दुर्दशेत खितपत पडलेली असेल तर नवीन पिढीस सुसंस्कारित होणे अशक्यच आहे.

केसरीच्या पहिल्याच वर्षाच्या तेवीसाव्या अंकात "बाल विवाहापेक्षा सती बरी" या लेखात आगरकर म्हणतात" सगंणस वाचक हो हा बाल विवाह नव्हे आमच्या देशाला महाक्षय रोग लागला आहे. सतीची चाल म्हणाजे एक घाव दोन तुकडे या म्हणी प्रमाणे तात्काळ प्राण घेणारी तर बालविवाहाची चाल एखाद्या वृक्षाला हळूहळू नष्ट करणा-या किड्या सारखी अधिक घातक आहे."[२९] इतकी अन्यायाची दाहकता या चालीत होती. व स्त्रीवर कोसळणा-या घणाघाती घावांची व्याकूळता होती. राष्ट्राच्या ढासळणा-या पायाची सूचना होती. मुलींच्या अपरिपक्व अवस्थेत लादलेल्या या नियमाच्या बंधनातून तिला मोकळे करावे व समाजाने विचारपूर्वक ही चाल बंद पाडावी ही वैचारिक जागृती या लेखातून करावयाची आहे.

संसाराचा गाडा ओढण्याचे सामर्थ्य मुलामुलींच्यात येण्याच्या आधीच त्यांचे संसार सुरु होतात व संपतातही. सुखाचा संसार हा दैवाधीन प्राक्तनावर अवलंबून नसून तो स्वकर्तृत्वावर अवलंबून आहे. हयाची यथार्थ जाण सुध्दा रुढीच्या आधीन झालेल्या समाज विसरुन गेला होता व त्याच्या हया

विस्मृतीमुळे, देशावर अरिष्ट धडाधड कोसळत होते. आणि त्यापासून वाचण्यासाठी बालविवाहा सारखी चाल आगरकरासारख्या राष्ट्रवादी, सुधारकांनी सांगितलेल्या या महाप्रश्नाचा बंदोबस्त करणे गरजेचे होते.

## पुनर्विवाह:-

सामाजिक सुधारणेत आणखी एक स्त्री जीवनाची समस्या समाविष्ट होती ती म्हणजे पुनर्विवाहास संमती. लोकहितवादी आणि बाळशास्त्री जांभेकरांनी, पुनर्विवाहास प्रेरक असे लेख लिहून जनमताची मानसिक स्थिती या सुधारणेस अनुकूल करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले होते.

लहानपणी लग्न करणे जसे हिताचे नाही तसेच लहानपणीच विधवा झालेल्या स्त्रीला पुन्हा लग्न करण्यास बंदी घालणेही अन्यायकारी व अहितकारी आहे. डॉ. भांडारकरांनी व विष्णूशास्त्री पंडीत यांनी या विरुध्द आवाज उठविला पुनर्विवाहाची प्रथा पुराणात होती, स्मृति, श्रुतित पुनर्विवाह झाल्याची साक्ष आहे हे दाखवून दिले आहे. पुरुष पुनर्विवाहास पात्र आहे तर स्त्री का असू नये. विधवा विवाहाला बंदी घालणाऱ्या शास्त्री पंडीतांचे हितसंबंध त्यात गुंतलेले आहेत म्हणूनच ते ही चाल बंद पाडावयास तयार नाहीत. आपली सर्वांगीण सुधारणा व्हावयाची असेल तर " विवाह पध्दतीत अमुलाग्र बदल व्हायला पाहिजे"[३०] असे नारायण केशव बेहरे आपल्या अहिल्योध्दार या कादंबरीत म्हणतात. पुनर्विवाहावर तर शंकराचार्यांनी पुण्यास घातलेला वाद सर्वांना परिचीत आहे. पुनर्विवाहा मुळे विवाहातील व्यक्तीगत न्यायबुध्दी बरोबर वंश परंपरेचा वारसा राखला जाईल. कुटूंब व कुटुंबाला दुव्या प्रमाणे जोडणारी विवाहसंस्था पुनर्विवाहाच्या सुधारणेमुळे सामाजिक नितीमत्ता अबाधित राहील. शिवाय पति सुखाचा स्पर्शही न झालेली बालविधवा, केशवपनाच्या रुढीनुसार विद्रुप करुन तीला बहिष्कृत जीवनाचे दान दिले जाते तेंव्हा तिच्या जीवनाची, उभ्या आयुष्याची लक्तरे करण्यापेक्षा, तिला अकारण वैराग्याची शिक्षा भोगायला लावण्यापेक्षा तिचा पुनर्विवाह करुन देणे केंव्हाही तिच्या व समाजाच्या हिताचेच ठरेल कारण "सक्तीचे प्रेम जसे हास्यास्पद तसे सक्तीचे वैराग्यही हास्यास्पद आहे." [३१]

मि. मलबारी इंडियन स्पेक्टेटर पत्राचे संपादक यांनी बालविवाह व सक्तीचे वैधव्य यांचा निषेध करणारे दोन लेख लिहून हिंदुस्थान सरकारकडे पाठविले आणि या चालीवर प्रतिबंध करणारा कायदा करा असे निवेदन केले आहे.

परकीयांच्या हस्तक्षेपाचा आधार घेऊन समाजाला कीड लावणाऱ्या घातकी चाली बंद करा असा याचनेचा हात पसरावा लागणे यापेक्षा आपले दुर्दैव ते कोणते. विश्वनाथ नारायण मंडलीकांनी याविषयी खेद दर्शविला आहे. "स्त्री जीवनात विवाहाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पण हा पवित्र संस्कारही अनेक समस्यांचा निर्माता आहे."[३२] विधवा विवाहावर जेंव्हा वाद होऊ लागले तेव्हा सनातनीयांनी या चालीचे समर्थन केले. ही चाल प्रचलित ठेवल्यास राष्ट्रोन्नती, सामाजिक नितीमत्ता, सांस्कृतिक अधोगती निश्चीत रसातळाला जाईल याची जाणीव सुधारकांना होती म्हणूनच अंतिम साध्य या वि.वि.ज्ञा.वि.तील लेखात "विधवा विवाहाकडे समाजाची प्रवृत्ती होणे हे समाजाच्या नैतिक विकासाचे साधन लक्षण व फल आहे."[३३]

समाजाने विधवांना जीवन जगणे मुष्कील करून टाकले आहे तिची शोचनीय स्थिती कबुल करावयास समाज कचरतो आहे. या दयनिक विधवांची दखल भांडारकरांनी घेतली आहे व त्यात त्यांना राष्ट्रहित देशहिता बरोबरच, बौध्दीक आणि नैतिक अभिवृध्दी अभिप्रेत आहे. या प्रकरणाकडे सरकारचे लक्ष वळवून ते म्हणतात"धर्माच्या संमतीने अज्ञ अर्भकांच्या व असहाय्य अर्भकास राक्षसी पालकाच्या क्रूर जबडयातून उध्दरावे अशी विनंती सरकारला करीत आहे."[३४] हीच खरी सुधारकांची तळमळ, त्यांच्या अंतरी वसत असलेल्या राष्ट्रप्रेम, देशप्रेम व समाजप्रेमाचे दर्शन डॉ. भांडारकरांप्रमाणेच नीळकंठ पांडूरंग पाटणकरांनीही या समस्येवर लक्ष केंद्रित करून समाजास तत्पथावर आणण्याचे प्रयत्न केले व अनाथ गाईंची दुःखे हलकी करण्याचे प्रयत्न केले व आश्चर्याची व धक्का देणारी वास्तवता ही की उच्चभ्रू सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या समाजात हा धर्माचा आंधळा खेळ चालू होता अशिक्षित बहुजन समाजातील स्त्रियांचे काय हाल असतील य

करवत नाही. "ब्राह्मण लोक आपल्या मुलीला मारल्यापेक्षा अधिक दुःखात ठेवतात. त्या दुःखास पारावार नाही."[३५] आणि त्यामुळे या भूतलावर "स्त्रियांचे दुःख इतके भारी आहे की त्याची आठवण झाली तरी अंगावर रोमांच उभे राहतात."[३६] व या रोमांच्यातूनच विचारवंताची विचारशक्ती जागृत झाली होती.

बाल विवाह, पुनर्विवाह या चाली प्रमाणेच मुरळी, कन्याविक्रय, ही चाल समाजात रूढ होती. खंडोबाला कुमारिका मुली वाहून टाकायच्या वेश्याव्यवसायासाठी मुलीची विक्रि करावयाची या मुरळ्या देवाला वाहिलेल्या असल्यामुळे धर्माच्या पवित्र व थोर नावावर समाजात शिष्ट संमत होऊन चालणारा हा एक व्यभिचार आहे. हिंदूधर्माचा हा उपमर्द आहे. धर्माच्या नावावर "धर्मबंधनाच्यावर आधारित असलेला स्त्री पावित्र्याचा प्रश्न, स्त्रीच्या नैसर्गिक असहाय्यतेचा फायदा घेऊन तिच्याच माथ्यावर सर्व पापाचा डोंगर रचणारा समाजाचा अलिखित कायदा जुलमी नाही असे कोण म्हणेल ?"[३७] धर्माच्या नावावर आजही ह्या मुरळ्या उर्फ देवदासीचा प्रश्न सुटलेला नाही. कुठल्याही कायद्याने हा प्रश्न सोडविण्यापेक्षा समाजाने ख-या नीतिमत्तेने माणूसकीने वागूनच हा प्रश्न सोडवला पाहिजे. " पण स्त्री स्वभावाला सहज अधःपाताच्या गर्तेत नेणारी विलास लालसा व संपदेचा लखलखाट या दोन गोष्टींनी स्त्रिया फसतात आणि आजच्या आमच्या समाज घटनेत औदार्याला फारसा काय पण मुळीच वाव नसल्यामुळे एकदा फसलेली स्त्री पापात अधिकच गुरफटते."[३८] आणि समाज त्याचा स्वसुखासाठी फायदा घेतो. स्त्रियांकडे बघण्याचा एकंदर दृष्टीकोनच विलासी, उपभोगी आहे त्यामुळे तिच्यातील सात्वीक तेजाचे दर्शन या समाजाला कधीझालेच नाही. हा तिच्यावर जुलूम जो चालविला आहे त्यात नीतिमत्ता, धर्मविचार, सत्कार्य, विवेक, युक्ती, या सर्वांचा अभाव दिसून येतो. अविचारी पणाने हे कृत्य केले जाते.

पण यापुढे हा अविचार चालणे शक्य नव्हते. तर समाजाची जडण घडण बदलणार होती, ती सद्गुण आणि सद्विचारांच्या तर्कनिष्ठ आणि बुध्दीनिष्ठ विचारांच्या आधाराने जोपासली जाऊन हा सद्विचार मनात

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

जागा होत होता.

बालविवाह, पुनर्विवाहासबंदी, कन्याविक्रय, मुरळयांचा प्रश्न, या अनिष्ठ चालीवर सतत प्रहार करुन जनमताचा विचार प्रवाह शुध्द करण्याचे कार्य हया लेखातून समाजसुधारक करीत होते. १९व्या शतकात, या अनिष्ठ प्रथेचा निर्मुलनाचा विचार करतांना स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलू लागला व स्त्रीयातील तेज, शक्तीची जाणीव होऊ लागली.

स्त्री शक्तीची ओळख:-

स्त्रीचे व्यक्ती म्हणून कांहीं स्वतंत्र अस्तित्व आहे. तसेच कुटूंब, समाज, संस्कृति याच्याशी तिचा अतूट संबंध आहे. हयाची जाणीव लोकांना होऊ लागली, ती सामाजिक पावित्र्य सांभाळतेच आणि वात्सल्य व प्रीती हे सद्गुणही मानवता वादी धर्माचे आदीस्थान आहे ते ही तिच्यात समाविष्ठ आहे हयाची जाणीव होऊ लागली. " सर्व मानव सृष्टीचा उत्पादक जो मूळ पुरुष त्याच्याही अर्धांगभूत ज्या स्त्रिया त्यांचे आणि पुरुषांचेच अवयभूत जे इतर वर्ण ज्यास आपण विव्दन बहिर्भूत अथवा कनिष्ट वर्ण मानतो त्यांचे अधिकार आपण सर्वस्वी कमी केले. त्या योगाने आपण आपलेच अधिकार कमी केले आणि तेणे करुन आपण आपणालच साक्षात अनंत दु:खास आणि गैर सोईस पात्र केले व आपल्या प्रियदेशात निकृष्ट स्थितीत आणून पोहचविले यात कांही संशय नाही."३९ म्हणून आजवर गुलाम बनवून ठेवलेल्या स्त्रीचा अधिकार तिला परत मिळावा आणि स्त्री पुरुषाइतकाच महत्वपूर्ण समाज घटक आहे हे लक्षात आणावे. लोकहितवादींनीही स्त्री पुरुष समानतेचा विचार मांडला होता तसेच विष्णू परशूराम पंडीतानाही मुंबई इथे झालेल्या सभेत हा विचार मांडला.

माता आणि बालक, सुगृहिणी, खरेप्रेम, स्त्रीचे तेज, कुटुंबसंस्थेतील तिचे स्थान आणि महत्व आताचर्चीले जाऊ लागले. आईची थोरवी मुलांच्या संगोपनातील निस्वार्थप्रेमातून दिसून येते. कारण मुलांवर संस्कार घडविण्याचे कार्य ती वात्सल्याच्या भावनेतून करते. कोवळया रोपटयाची योग्य पध्दतीने निगा ठेवल्यास ज्याप्रमाणे ते फळापुलांनी बहरुन येते तत्वत आईच आपल्या

मुलाच्या ठायी सद्वर्तनाचे बीज पेरते. बुध्दीमत्ता, अलौकिकता, नीतिमत्ता औदार्य हे गुण आई पासूनच येतात. "सुशीलो मातृ पुण्येन" म्हणूनच म्हटले आहे." प्रकाश, वायु, उष्णता, उदक इत्यादिकांचा जसा सृष्टीतील वनस्पत्यादिकांवर परिणाम, तसाच मातेच्या मनाचा मुलावर परिणाम घडतो." ४० कुठल्याही यशस्वी पुरुषांच्या मागे चांगली माता, चांगली गृहीणी असते. हे सत्य आहे. माणूस आईच्या कुशीत वाढतो पण त्याचे वाढणे, सामाजिकतेशी संबंधीत असते, म्हणून समाजातील प्रत्येक माणूस सर्वगुण संपन्न नसला तरी नीतिमूल्यांची बूज राखणारा, सुसंस्काराचे बीज करणारा असावा लागतो.

जी स्त्री ही जीवनमूल्ये जोपासते तिच जर "अबला" दुर्बल म्हणून समाजाने दूर लोटली, तर या नैतिक मूल्याचे अवमूल्यन निश्चीतच होणार. "कोणत्याही समाजात जी चांगली वाईट स्थित्यंतरे होत असतात ती त्या समाजातील स्त्रियामूळे होत असतात." ४१ समाजातील विवेकी व विचारी सुधारकांना ह्यातील सत्य समजले तेंव्हाच त्यांना स्त्रीचे तेज, शक्ती दिसून आली. "चांगली स्त्री हाच पुरुषांचा शहाणपणा सामर्थ्य आणि धैर्य होय." ४२ म्हणून जीवनाच्या कुठल्याही अंगात स्त्रीचे सहकार्य हे महत्वपूर्ण असते. कुटुंबातील तिचे स्थान अनन्यसाधारण असते, त्यामुळे तिची सामाजिक प्रतिष्ठाही मोलाची असते. संस्कार आणि संस्कृतीशी तिचा निकटचा संबंध आहे. कौटुंबिक स्वास्थ्यावरच सामाजिक संपन्नता अवलंबून असते. निःष्कामप्रीती, स्वार्थ निरपेक्षता, एकनिष्ठता, श्रध्दा, समर्पणाची भावना, या अनमोल सद्गुणांची शिदोरी स्त्रियांच्यात उपजतच असते."कौटूंबिक कर्तव्या इतकीच किंबहूना त्यापेक्षाही अधिक सामाजिक कर्तव्ये मानवी जीवनात असतात याची तिला पुरेपूर जाणीव असते. कुटुंबाइतकीच ती स्वतःसाठी जगू शकते, स्वतःइतकीच ती समाजासाठी जगण्याची नवी महत्वाकांक्षाही मनात फुलवीत असते." ४३ सुगृहिणी, खरेप्रेम, बायकोभक्तीतर नवराभला, पत्नी, स्त्रीचे तेज, पुष्पकरंडक पुस्तकपरीक्षा, गुणवती स्त्री, अशा लेखातून स्त्रीचे तेज निदर्शनास आणून दिले गेले. ती अबला नसून सबला आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न झाला.

सासुरवास ह्या लेखातून ही स्त्रीयांच्या गुणांची सुधारक व

सनातनी यांच्या दृष्टीकोनातून सांगड घातली आहे. स्त्रियासुध्दा अहंभावाने स्वत:चे तेज लोपवून टाकतात, आत्मसंयमनाच्या अभावी त्या सद्वर्तन विसरतात. व स्वत:ला भोगाव्या लागणाऱ्या यातनांना कुठेतरी वाचा फोडली जाते व सासुरवासाचा या भावनेपोटी जन्म होतो. सजातीय वर्गात शत्रुत्व निर्माण होते आणि स्त्री स्वत:हाची संघटित शक्ती स्वत:च कमी करते. स्त्रीच्या सामर्थ्यावर विचार संपन्नतेवर त्यामुळे बांध घातला जातो. याला जबाबदार विचारातील अविवेकीपणा असतो.

जेंव्हा स्त्रियांना आत्मविश्वास, आत्मशक्ती, आत्मसन्मानाची जाणीव होईल तेंव्हा स्त्रीचे तेज अधिक तेजस्वी होईल. परंपरावादी पार्वती काकू, नवीन विचारांना आत्मसात केलेल्या रमाकाकूंच्या चित्रणातून, स्त्री जीवनाचा हाही एक कंगोरा, उलगडून दाखविला आहे. सद्शिक्षणाने आलेला वैचारिक पोक्तपणा अज्ञानाला दूर सारून सद्वर्तन करण्यास प्रवृत्त करते, म्हणून रमाकाकूने, सासुरवासाने पिडलेल्या नर्मदेला स्वावलंबी केले आहे व प्रयत्नाने, स्वसामर्थ्याने, शिक्षणाने, स्त्री स्वत:चा आत्मसंन्मान कोमेजून जाऊ न देता, स्वाभिमानाने जीवन जगू शकते हे दाखवून देणे हीच या मागे असलेली एक भूमिका आहे. स्त्रीयांच्यात आत्मविश्वास निर्माण करून तिच्या अस्तित्वाची हरवलेली जाण निर्माण करून देण्याची गरज या विचारात दिसून येते.

एकाच वस्तूच्या दोन भागात भिन्नगुण असूच शकणार नाहीत, तसे स्त्री, व पुरुष यांच्यात भिन्न गुण असूच शकणार नाही, विकार, विकृती, सद्भावना, सद्विचारांचे देखील दोन्ही घटकात सारखेच वाटप केलेले आहे पण स्त्रीयांना सातत्याने होणाऱ्या अन्यायाने, अंधश्रध्दा, अपंग करून टाकले होते. तिचे मनोधैर्य कमकुवत झाले होते, प्रतिकार शक्तीची तिला जाणीवच नव्हती. अंध-श्रध्देनी ती ग्रासून टाकली होते. चोहोबाजूनी सतत होणाऱ्या अन्यायाने विकलांग झाली होती. या सर्व कमकुवतपणातून तिला बाहेर काढून तिच्या शक्तीचा व तेजाचा झालेला अस्त पून्हा उदयास आणावयाचा होता, स्त्रीयांच्या पुनरुत्थापनाला विचारवंताकडून प्राधान्य दिले जाऊ लागले व तिला या अज्ञा-नातून या मानसिक दुर्बलतेतून अपंगत्वातून बाहेर काढण्यासाठी एकमेव मार्ग होता-

तो म्हणजे शिक्षण. शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नव्हता. स्त्री शिकून शहाणी झाली तरच आपल्या उन्नतीला दिशा मिळून गती प्राप्त होणार होती.

स्त्री शिक्षणातील टप्पे, व स्त्री शिक्षणा विषयीचे मत प्रवटन:-

महाराष्ट्रांत प्रामुख्याने पेशवाईचा अंत होऊन महाराष्ट्राच्या भाळी रेखाटलेल्या अंधारयुगाची समाप्ती झाली आणि १ नोव्हेंबर १८१९ रोजी दिलदार व उदार मनोवृत्तीच्या एलफिन्स्टनने मुंबईचा गव्हर्नर म्हणून महाराष्ट्रात पाऊल ठेवले. "वित्ताच्या आणि जीविताच्या सुरक्षिततेची हमी जुलूम जबरदस्तीतून सुटका, अन्यायाविरुध्द दाद मागण्याची सवलत, आणि न्याय मिळविण्याची खात्री, शिक्षण आणि धर्म विषयक बाबतीत स्वातंत्र्य."[४४] ही त्याच्या कारकिर्दीची वैशिष्ठ्ये आहेत. "परंपरागत रूढीच्या आहारी गेलेल्या आणि अनेक अमानुष घातुक चालीरितीनी अक्षरशः बुजबुजलेल्या सामान्य समाजाला सुलंस्कृत करण्यासाठी शिक्षण हेच एक प्रभावी साधन आहे हे ही त्याने अचूक हेरले."[४५] आणि या पार्श्वभूमिवर त्यानी महाराष्ट्राचा कायापालट केला. १८१९ साली पुण्यात एक विद्यालय सुरू केले. १८२० साली हिंदू मुलांसाठी शाळा काढली. त्याही आधी १८१४ साली पाद्री मिशन-यांनी इथे मुलींसाठी शाळा काढली होती. पण आश्चर्यकारक वाटणारे एवढे मोठे परिवर्तन तात्काळ घडून येणे आपल्या धर्माधिष्ठीत विचारांच्या कल्पना शक्तीच्या बाहेरचे होते.

पण या शिक्षणाच्या वातावरणामुळे, नवविचारसरणीचे नाना शंकर शेटे यांनी स्त्री शिक्षणाच्या कार्याला पाठींबा दिला, लोकहितवादी बाळशास्त्र जांभेकर, यांनी "प्रभाकर व दर्पण"मधून स्त्री शिक्षणाची गरज, व महत्त्व समाजाच्या कळी उतरवले होते. १८५१ साली या कल्पनेला जोतिराव फुल्यांनी सत्यात साकार केले व परिस्थितीला आकार दिला, पुण्यात सनातनीयांच्या बालेकिल्यात मुलींसाठी शाळा काढली व स्वतःची पत्नी सावित्री बाई फुले यांना या कार्यात झोकून दिले. ज्ञानाची ज्योत प्रत्येक अज्ञानी स्त्रीच्या अंतःकरणात प्रज्वलीत होणार, स्त्री शिकणार हा विचार समाजकंटकांना असह्य झाला. त्यांनी त्यास कडाडून विरोध केला.

स्त्री शिक्षणाचा पुरस्कार म्हणजे, समाज विघातक कार्य,

समजले जाऊ लागले. त्यांच्या विरोधाला न जुमानता स्त्रीयांना शिकवण्याचा केलेल्या विचारा पासून सुधारकांनी आपणास तसूभरही ढळू दिले नाही. ज्योतिराव फुले, प्रो. कर्वे, रमाबाई रानडे इ. कर्त्या विचारवंतानी आपले कार्य चालू ठेवले. हळूहळू त्याचा अपेक्षित विस्तार होण्यास सुरुवात झाली.

स्त्रियांची परवशता सुजाण व परिपक्व विचारांच्या लोकांना अहितकारी वाटू लागली. व तिला शिक्षण दिल्याशिवाय याला पायबंद घालता येणार नाही व तिच्या व्यक्ती विकासाची दालने उघडणार नाहीत. तिच्यातील आत्मविश्वास पुन्हा जागृत होणार नाही ही वास्तविकता होती, तर याउलट स्त्री शिकली तर या भूतलावर अनर्थ होतील, पाप वाढेल, "सन्मार्गी असलेल्या स्त्रियांची स्थिती शिक्षणाने बिघडेल."[४६] स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे कुमार्गी लावणे असे हास्यास्पद विचार स्त्री शिक्षणाविषयी मांडले जाऊ लागले. आजवर अज्ञानी स्त्रीयांना मुक्या गाईसारखे जुलमाच्या दावणीला बांधून ठेवणे स्वार्थी समाजाला सहज शक्य होते. "स्त्रीयांस शिक्षा दिली असता त्यांची मने चांगली व्हावयाची व त्यांचा स्वभाव दयाळू व्हावयाचा तो एकीकडे राहून उरफाटया हरामी आणि दुष्ट होतील."[४७] असे ही विचार मांडले जाऊ लागले व स्त्री शिक्षणाला विरोध होऊ लागला. स्त्रीला शिक्षण देण्याच्या विचारात धोके अधिक आहेत असे समाजाला प्रकर्षाने वाटू लागले. पण आपली झालेली मानहानी आपल्याला पत्करावी लागलेली गुलामगिरी समाज धुरीणांना जाचक वाटत नव्हती, पारतंत्र्याची खंत वाटत नव्हती.

स्त्रीचे अज्ञानत्व जोपासण्यापेक्षा, एकजुटीने त्याचा प्रतिकार करुन राजनिष्ठा, देशभक्ती जागृत करुन आपले स्वातंत्र्य परत मिळवू ही कल्पनाही त्यांना अनभिज्ञ होती पण "राजकीय परिस्थितीचा संताप व उद्वेग पुरुषापेक्षा स्त्रियास जास्त येतो असे रशियातील विद्यार्थीनी वरुन दिसून येते."[४८] याचा अर्थ स्त्रियांचा स्वातंत्र्य मिळविण्यात हातभार असणे आवश्यक होते. "स्वदेशीच्या कामी स्त्रियांच्या सहाय्यावाचून कोणतीच फल प्राप्ती होणार नाही."[४९] ही वस्तुस्थिती होती म्हणून स्त्री शिक्षणाच्या विरोधाला न जुमानता शक्य होतील त्या मार्गाने स्त्रियांना शिक्षण दिले जावे असा सुधार-

कांचा प्रस्ताव होता. राष्ट्रवादी विचारसरणीतही स्त्रीला त्यामुळे प्रतिष्ठा देण्याचा विचार मांडला गेला. आगरकरांच्या विचारांचा प्रभाव "कलकत्ता येथील महिला परिषदेचा" आढावा नमूद करतांना या लेखातून दिसून येतो. "मनुष्याचा व्यवहार सुरळीत चालण्यास, उत्तरोत्तर त्याचे पाऊल पुढे पडत जाण्यास ज्ञानवृध्दी आणि ज्ञानप्रसार या सारखे साधन नाही, हे कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राकडे नजर फेकली असता ध्यानात येणार आहे. मानसिक व शारिरीक क्षीणता दारिद्र्य, पारतंत्र्य, धर्मसंबंधाने वेडया खुळ्या समजूती, जातीभेदासारखे हजारो पिढया चालत आलेले जबरदस्त निर्बंध इत्यादिकांनी गांजून पिळून अथवा चिरडून जाऊन मरणोन्मुख झालेल्या देशात शिक्षणावाचून तरणोपाय आहे असे आम्हास वाटत नाही."[५०] हया उता-यावरून तत्कालीन समाजात शिक्षणाची नितांत आवशक्ता आहे. या विचाराने महाराष्ट्रात मूळ धरून ठेवले होते हे स्पष्ट होते.

दादोबा पांडुरंग, भांडारकर, पाटणकर, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, जोतिराव फुले, न्यायमूर्ती रानडे, नारायण केशव बेहेरे, प्रो. कर्वे यांनी स्त्री शिक्षणाची बाजू उचलून धरली होती. "अज्ञान म्हणजे अंधार आणि शिक्षण म्हणजे प्रकाश ही भूमिका ज्योतिरावांनी स्विकारली."[५१] ज्या स्त्रीत नवनिर्मीतीचे अफाट, अचाट, सामर्थ्य निसर्गत:च आहे. तिच्याच हातात जगदोध्दाराचे दोर आहेत म्हणूनच ती शिकली पाहिजे व अज्ञानाचे सावट तिच्या वरून दूर केले पाहिजे. असा शुध्द आणि विवेकी विचार बुरसटलेल्या, मागासलेल्या परंपरावादी विचारसरणीवर मात करू लागला "शिक्षणामुळे माणसाची केवळ बौध्दीक वाढच झाली पाहिजे असे नसून त्याची नैतिक पातळी वाढली पाहिजे."[५२] अशा उद्देश्याने शैक्षणिक अभ्यासक्रम सुरु करण्यात येऊ लागले व स्त्री शिक्षणाचे महत्व सनातनीयांच्या गळी उतरवले जाऊ लागले.

स्त्रीला शिक्षण द्यायचेच असेल तर कौटुंबिक क्षेत्रापुरतेच ते मर्यादित असावे, किंवा जुजबी लिहिणे वाचणे, हिशोब ठेवणे, इतपत तिला शिक्षण द्यावे. कारण मुळातच तिची बौध्दीक कुवत कमी आहे, तिची मनोवृत्ती भावनाप्रधान आहे. शारिरीक कमकुवतपणा, प्रसुती आणि मासिक पाळी

यामुळे येणारा अशक्तपणा यामुळे तिला मर्यादित विषयाचे शिक्षण द्यावे. "पुरूषात शिक्षण देण्याची जी पध्दती हल्ली प्रचारात आहे ती स्त्रीयांना शिक्षण देण्याचे कामी उपयोगी नाही.[५३] ही संकुचित वृत्ती या विचारात होती.

काहींच्या मते तिची बौध्दीक पातळी वाढवून ती स्वावलंबी बनावी, तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळावे, व पुरूषांच्या बरोबरीने तिने जीवनाच्या सर्व क्षेत्रात पदार्पण करावे अशी स्त्री शिक्षणाबद्दलची व्यापक दृष्टी कांही विचारवंतांची होती.

असे वाद-प्रवाद निर्माण होऊन स्त्री शिक्षणात फाटे फोडण्याचे कार्य समाज कंटकांनी केले तर, विरोध आणि अवरोधाच्या विचारातून मार्ग काढून सतर्क व तारतम्याच्या कसोटीवर स्त्रीशिक्षणास दुजोरा मिळू लागला. जपान, रशिया, फ्रान्स या देशांची उन्नती साधण्यामागे स्त्रियांचा वाटा महत्त्वाचा होता. संबंध जगाच्या पाठीवरील इतिहास हेच सांगत होता. "समाजाची उन्नती होण्यास त्यातील स्त्रीवर्गाची उन्नती होणे अगदी अवश्य आहे. पूर्वसंस्कार व नवीन महत्वाकांक्षा देशातील तरूण व होतकरू पिढीच्या अंगांत उत्तमपणे बिंबविण्यास स्त्रियांशिवाय दुसरे साधन नाही." ५४ म्हणून स्त्रियांना प्रथम गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करून, स्वतंत्र करणे गरजेचे आहे.

"Today we are convinced that the elevation of woman is the elevation of the race. She is the epitome of the past and the reservoir of the future, so that the responsibility of the new social life, which is dawning on the ancient realms of the sungoddess may be safely entrusted to her care since the restoration we have not only conformed the equality of sex in law but have adopted that attitude of respect which the west pays to the woman." ५५ संबंध जगात घडणाऱ्या घडामोडी, स्त्रीच्या प्रतिष्ठेची, उच्च दर्जाची ग्वाही देतात. स्त्री शिक्षणाची विशाल आणि आदरयुक्त आकांक्षितता जिथे पाश्चात्य

असेल तिथेच सांस्कृतिक संपन्नतेचा साठा भरलेला असतो.

पाश्चिमात्य राष्ट्राने दिलेली ही नवीदृष्ट्री, जपान, फ्रान्स मधेही रूजली गेली तेंव्हा समाज प्रगती पथावर आरूढ झाला म्हणून भारतात व महाराष्ट्रातही ही वैचारिक क्रांती घडवून आणण्याची खटपट सुरू झाली.

या सर्व परिस्थितीचा अभ्यास करून स्त्रीयांच्या सर्वांगीण विकास साधण्याचे प्रयत्न आपण करत असलो तरी भरभराटी व वर्चस्वाचा काळ आण-ण्यासाठी आपल्या संस्कृतिला तडा जाऊन देता कामा नये. "पाश्चात्यांच्या जीवनाचे आदर्श जसेच्यातसे आपणास घेता येत नाहीत व घेणे इष्टही नाही. हे दिसून येऊ लागले. आपल्या जुन्या परंपरागत आदर्शाच्या संशोधनाला व निरिक्षणाला त्यामुळे या काळात अधिक जोर चढला होता."[५६] व समन्वय-वादी विचार सरणीतून असे विचार मांडले गेले.

स्त्री शिक्षणाचे ध्येय व दिशा, स्त्रीजीवनावर प्रकाश टाकणारे दोन लेखांक "स्त्रीयांच्या शिक्षणाकरीता चालू असलेले प्रयत्न" कुटुंब सुख आनंदीबाई जोशी, कृपाबाई सत्यनाथन, डॉ. आनंदीबाई जोशी यांचेतील यांच्या चरित्राचा उल्लेख शिक्षणाचे चांगले परिणाम कसे समाजहितकारी अस-तात हे दाखविणारा आहे. इंदिराकाव्याचे, परिक्षण, पुष्पकरंडकाचे परी-क्षण, कलकत्ता येथील महिला परिषदेचा आढावा, आई व तिची कर्तव्ये, आई व तिची थोरवी, अशा लेखातून स्त्रियांच्या जीवनात जो शिक्षणाचा नवा मनू आला आहे त्याचे परिणाम कसे असतील हे हिंदू संस्कृतिच्या दृष्टी-कोनातून मांडले आहे.

## स्त्री शिक्षणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या वाद-प्रवाद(झालेले)

स्त्रियांना शक्यतो गृहशिक्षण दिले जावे जेणे करून मर्यादेचे उल्लं-घन होणार नाही, कौटुंबिक स्वास्थ्य बिघडणार नाही, गृहशिक्षणातून तिला तिच्या कर्तव्याची जाण करून द्यावी, सद्वर्तन आणि सद्विचारांची वृध्दी होईल असे शिक्षण तिला मिळावे गृहिणी, माता, पत्नी, या भूमिके-तून वागतांना तिने प्रगल्भ विचाराने वागावे, संगोपनाचे, आरोग्याचे धडे

तिला द्यावेत. "अर्भकाची मने प्रफुल्लित ठेवून त्यास योग्य वळण लावणे व त्याचे योग्य संवर्धन करणे वगैरे नाजूक व जबाबदारीच्या कामाची अवघड कला तिला साधली पाहिजे व वाचनातील चारदोन शब्द तिच्या कानावर पडले पाहिजेत व त्याचा विचार करण्यास तिला अवकाश सापडला पाहिजे." [५७] योग्य गोष्टीचे अवलोकन व सदाचाराचे आकलन तिला झाले पाहिजे, तरच उद्याची भावी पिढी सुज्ञ, विवेकी, सुदृढ निपजेल. स्त्री संस्कृतीची जोपासना करणारी प्रमुख घटक आहे. सुसंस्कार घडविणारी शिल्पकार आहे म्हणून "बालोपयोगी साहित्य" या लेखात कमळाबाई किबे यांनी इंदूरच्या साहित्य संमेलनांत वाचलेल्या लेखात मुलांच्या बौध्दिक आणि मानसिक संगोपनाची रीत सांगितली आहे. मुलांच्या वाङ्मयीन अभिरुचि बरोबरच, त्यांची वैचारिक व बौध्दीक पातळी वाढविली जाईल याची दक्षता घेणे ही आईची जबाबदारी आहे. लेखकांनी तशी पुस्तके काढावित व सूज्ञ आईनी त्यातून संस्कारक्षम मुले घडवावित पण प्रश्न आहे तो "सर्व विषयाचे थोडे बहूत ज्ञान आहे अशा माता आपल्यात शेकडा पाच तरी सापडतील का? हा स्त्रीयांचा अपराध नव्हे. बिघडलेल्या स्थितीचा हा प्रभाव आहे. पण बिघडलेल्या स्थितीमुळे चाललेला हा प्रकार मात्र शक्य तितक्या लवकर बंद केला पाहिजे." [५८] देशाचे भवितव्य उज्वल करण्यासाठी प्रथम ह्या अज्ञान माता शिकून सज्ञान, झाल्या पाहिजेत. स्त्री शिक्षण हे जीवनाच्या अभ्युदयाचे केंद्रस्थान आहे. स्त्रि.याजवळचा सद्गुणांचा उपणत साठा, देणे करून ती आपल्या आपत्यांना देऊन सर्व गुणसंपन्न, सुसंस्कारीत अपत्य तयार करेल तेंव्हाच समाजाचा कायापालट होईल.

स्त्रियांची कौटुंबीक जबाबदारी, संगोपनाची पात्रता, मातृत्वाची जाण, यातील उचित मर्म जाणून तिला आपले कर्तव्य पार पाडता येईल असे हे शिक्षण तिला द्यावे. पंजाबात स्त्री शिक्षणासाठी अनेक सुविधा प्राप्त झाल्या आहेत महाराष्ट्रातही तशा सोयी शिक्षणाऱ्या स्त्रीला मिळाव्यात अशी सुचना "स्त्रियांच्या शिक्षणाकरिता चालू असलेले काही प्रयत्न या लेखातून दिली गेली तिच्यासाठी वसतिगृह असावे असे सूचविले पण कुटुंबाच्या मर्यादेची चौकट विस्क-

ळित, उध्वस्त न करता स्त्रीला शिक्षण द्यावे व तिचा व्यक्ती विकास साधावा अशी मते मांडली गेली होती. एकंदर आपली आचारविचार सरणी जुन्या संस्कारावर जोपासली होती. त्यात कुटुंब संस्थेला प्राधान्य होते. म्हणून स्त्रीयांच्या शिक्षणाच्या नव्या मनूकडे बघण्याचा दृष्टीकोन कुटुंब आणि समाजापुरताच होता. तिचे आर्थिक स्वावलंबन समाजाने नाकारले होते.

स्त्री जीवनावर शिक्षणाचे होणारे दुष्परिणाम:-

बदलत्या महाराष्ट्राचे सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय स्थिती स्पष्ट करतांना स्त्री शिक्षणामुळे एकंदर समाजाची घडण कशी होईल, समाजाचे बदलते स्वरुप कसे असेल हया विचाराने अनुकूल प्रतिकूल मत प्रकटन सुरु झाले. "सामाजिक विचारशुध्द भौतिक कार्यकारण मीमांसाने केला पाहिजे."५९ हे जरी सत्य असले तरी स्त्री शिकून स्वतंत्र झाल्या बरोबर, तिच्या व्यक्ती विकासामुळे समाजात नवीन समस्यांचा उदय होईल. स्वैराचारीवृत्ती बंधनाचे जू झुगारुन देऊन सैरभैर होईल, त्यामुळे नीतिमत्तेला धक्के बसतील.

नवशिक्षित स्त्री एकत्रकुटुंब पध्दतीचा अव्हेर करुन विभक्त कुटुंब पध्दतीने समाजाचे संघटित रुप विस्कळीत करेल, प्रौढकुमारीकेचा प्रश्न उपस्थीत होईल, स्त्रीशिक्षणाअभावी आज जो न्यूनगंड स्त्री समाजात आहे त्याचे रुपांतर अहंगडात होईल, सहशिक्षणामुळे असभ्य, असंस्कृत वर्तन समाजात निर्माण होईल स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यामुळे अनिर्बंध वृत्ती डोके वर काढील आणि समाजाला अनेक नवीन समस्यांना सामोरे जावे लागेल, यासाठी स्त्रीशिक्षणाचे क्षेत्रच भिन्न असावे.

तिला व्यक्तीस्वातंत्र्य द्यावे पण नैतिक बंधनाला झुगारुन तिने त्याचा अवाजवी अवास्तव उपयोग करु नये अशी दक्षता या शिक्षणक्रमात असावी. तिने आत्म-सन्मानाने, अभिमानाने जीवन जगावे पण अहंकारी वृत्ती पासून दूर राहावे असे मत मांडले जाऊ लागले. समन्वयवादी भूमिकेतून स्त्री शिक्षण जर देता आले तर आपल्या संस्कृतिला तडा न जाता, आपली अभिवृध्दी करुन घेता येईल. एकंदर स्त्री शिक्षणातील उदात्तता आणि व्यापकता,

कौटूंबिक स्वास्थाच्या, मर्यादेतून बधीतली गेल्याने, तिला हा संकुचितपणा आला होता. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या विचारातील मंथनातून "हिंदू संस्कृतीचे वैशिष्ठ्य म्हणजे हिंदूस्थानातील स्त्रीया." ६० असा उदायुक्त भाव, निदान व्यक्त केला जाऊन तिच्या व्यक्तीत्वाचे महत्व पटविले गेले पण हिंदूस्थानाचे सांस्कृतिक वैशिष्ठ्य जोपासणारी स्त्री जर व्यक्तीस्वातंत्र्याच्या नावाखाली पाश्चात्यांचे आंधानुकरण करून शिक्षण घेऊ लागली तर आपले ध्येय, विचार, परंपरा, संस्कृतीला बाधा येईल असे न करता या प्रश्नाची उकल दोन्हीचा मध्य काढून करता येईल का?

मूलत: स्त्री पुरूषात प्रकृतिभेद आहे. स्त्रियांचे पुरूषीकरण **Masculinization** होण्याची शक्तता उच्चशिक्षणामुळे निर्माण होईल. युरोपात उच्चशिक्षणामुळे "त्यांच्यामधील स्त्री धर्माचा लोप होऊन त्या गृहिणी व माता होण्यास नालायक बनत चालल्या आहेत." ६१ या युरोपातील अनुभवावरून इकडील समाजसुधारकांनी व स्त्रियांच्या कैवाऱ्यांनी वेळीच स्त्री शिक्षणाचे धोरण ठरविणे योग्य होईल असे लेखक गो. म. चिपळूणकरांना वाटते.

मुलांच्या प्रमाणे शारिरीक आणि मानसिक विशेष मेहनत स्त्रीयांनी केली तर त्याचा वाईट परिणाम त्यांच्या आरोग्यावर होईल. स्त्रियांमध्ये असलेली एक आणखी नैसर्गिक समस्या म्हणजे तिची मासिक पाळी त्या कालावधीत संपूर्ण विश्रांती तिला मिळावी असे मत शारीरशास्त्रज्ञाने व्यक्त केले पण इथे "हिंदूधर्मकारांनी, आर्यवैद्यकीच्या पुरस्कर्त्यांनी" तिने "या दिवसात" अस्पृश्यावस्था पाळावी अशी धर्माज्ञा सांगितली आहे. त्यामुळे त्यांच्यात शारीरीक कमकुवतपणा येतो. म्हणूनं स्त्रिया उच्च शिक्षणास लायक नाहीत असे विचार मांडले. पण हे विधानही कोत्या मनोवृत्तीचे आहे कारण शास्त्राच्या आधारापेक्षा हिंदूधर्मकारांनी अशी आज्ञा दिली म्हणून तिचे पालन करावे हे मत न पटण्या सारखे आहे शिवाय आज स्त्रियांनी हे सिध्द करून दाखविले आहे की, हा सिध्दांत खोटा आहे. त्या अविश्रांत श्रम पुरूषांच्या बरोबरीने किंबहुना त्यांच्यापेक्षाही जास्त शारिरीक, बौध्दिक

मानसिक श्रम करण्याची ताकद आहे. स्त्रीच्या शिक्षणाकडे प्रतिगामी विचार सरणीतून बघीतले आहे हे स्पष्ट होते. तसेच स्त्रीला आर्थीक स्वातंत्र्य पण नाकारले आहे.

आर्थिक स्वावलंबन व त्याचे वैवाहिक आयुष्यावर होणारे परिणाम

स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळेल तेंव्हा स्त्रियांचे कर्तव्य क्षेत्र व्यापक होईल पण कुटूंब आणि नोकरी या क्षेत्रात काम करतांना तिच्या स्वास्थ्याला धोका निर्माण होईल आणि आर्थिक स्वातंत्र्यामुळे त्यांच्या नीती मत्तेच्या कल्पना बदलतील व त्या हितकारी नसतील. सहशिक्षण आणि सह-अर्थार्जन यामुळे सामाजिक नितीमत्तेवरही निश्चितच वाईट परिणाम होईल. पुरूषांचा सहवास लाभल्याने दोघांच्याही चित्तवृत्ती सैरभैर होऊन त्याचे दुष्परिणाम समाजाच्या नितिमत्तेवर होतील.

१) त्यांचे शील धोक्यात येईल.
२) त्यांच्या सहशिक्षणामुळे आणि सह आर्थिक स्वावलंबनाने स्वैराचार माजेल. वासना आणि विकृतिमुळे स्त्रीयांचे चारित्र्य स्वच्छ व पवित्र राहणार नाही.
३) शिकलेल्या स्त्रियांच्या अपेक्षा वाढतील आणि नोकरी करत असल्यामुळे मोठ्या मनाने तिच्याबरोबर संसार करण्यास पुरूषांची तयारी असणे दुर्मिळ होईल.
४) नोकरी करणाऱ्या स्त्रिया कुटूंब विभक्त करतील.
५) प्रौढ कुमारिकेचा एक नवाच प्रश्न पुढे उभाराहील.
६) "पांढरपेशा समाजातील कुमारिका मुलींची नोकरी कुटूंब स्वास्थविध्वंसक होईल की कुटूंब बलसंवर्धक होईल हा सर्वांनी विचार करण्यासारखा एक महत्वाचा प्रश्न आहे." ६२
६) स्त्रियांना नोकरी करू द्यावयाची असेल तर बालविधवांची व कुमारिकेची तिच्या नोकरीचे क्षेत्र तिच्या कुलशीलाची हमी घेणारे असावे.
७) कुटूंब स्वास्थ्य विध्वंसक व्यक्ती स्वातंत्र्यामुळे "देशाची नैतिक अवनति

मात्र होईल असे दिसते. परोपकारबुध्दी, स्वार्थत्याग, काटकसर व श्रमाची महति इत्यादि गुणांचा विकास घडवून आणणारी कुटूंब ही एक आर्थिक संस्थाच आहे. संयुक्त कुटूंबपध्दतीत ही संस्थाजर पूर्वीप्रमाणे नियमबध्द व सुसंघटित असेल तर ती एक लहानशी को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच आहे."[६३] ही आपली संस्कृति आहे. कुटूंबपध्दतीच्या जोरावरच आजपर्यंत आपण जीव धरून आपली आध्यात्मिक ध्येय व उच्च विचारसरणी जोपासली तिच कुटूंब-संस्था जर स्त्रीशिक्षण व पाश्चात्यांच्या अनुकरणाने नष्ट झाली तर? ही भिती समाजाला वाटत होती.

स्त्रीचेवैवाहिक आयुष्य:-

हिंदूस्थानात विवाहसंस्था ही समाजाचा उत्कर्षबिंदू आहे. संस्कृतिचा साठा आहे. "हिंदूस्थानात विवाहाच्या बाबतीत व्यक्तीवर धर्म, समाज, वर्ग व जाती इत्यादिकांचे नियमन सुरु आहे. विवाह व्यक्तीच्या हिताकरीता जरी असला तरी त्याचा प्रधान हेतू सामाजिक आहे व हा सामाजिक हेतू म्हणजे कुटूंब रक्षण, वंशरक्षण व संस्कृतिरक्षण." [६४] ही सर्व नैतिकता स्त्री स्वातंत्र्यामुळे स्त्रीशिक्षणामुळे विस्कळित, विकृत होईल. त्यातील धार्मिक पावित्र्य नष्ट होईल. बाल विवाहाची रूढी टाकून लग्नाची वयोमर्यादा वाढविलीतर प्रौढविवाह सुरु होतील व विवाहसंस्थेला वैयक्तीक कराराचे स्वरुप प्राप्त होईल. विवाहस्वातंत्र्यामुळे प्रेमविवाह घडून येतील विवाहाच्या पवित्र बंधनाचे रूपांतर हे दास्यत्व वाटण्यात होईल.

स्त्री शिक्षणाची आवश्यकता आहे पण त्यामुळे इथली विवाह व कुटूंबसंस्था उध्वस्त किंवा अस्थिर होऊ नये म्हणून "दोन्ही पध्दतीतील चांगल्या भागाचे एकीकरण करणे प्रयत्न केल्यास अशक्य होणार नाही. शिक्षण, विवाह व नोकरी हे प्रश्न." [६५] जर स्त्रियांना जरा वेगळ्या प्रकारचे शिक्षण दिले तर सोडविणे शक्य होईल. परंपरावादी दृष्टीकोनातून हे विचार [illegible] अतिशय संयुक्तिक आहे. पण प्रचलित रूढी, परंपरा, बंधने स्त्रियांना कुचंबणेचे आणि अवहेलनेचे जीवनमान देतच आहे. त्यापेक्षा तिने शिकून स्वावलंबी झाले तर तशा उपेक्षितेच्या अरिष्टा पासून निश्चीत स्त्रीचे

व्यक्तीमत्व समाजाची अवनती टाळू शकेल. नव्या सामाजिक घडणीचे स्वरुप निश्चितता हया कोंडमारा करणाऱ्या जीवनापेक्षा वेगळे असेल.

स्त्री शिक्षण क्रमातील विषय कोणते असावेत.

स्त्रीला शिकविल्याने ईश्वरी कोप होतात. स्त्रियांना शिकवणे अधर्माचे काम आहे ही समजूत आता मागे पडली होती. स्त्रियांना शिकवणे आवश्यक आहे. हया विचारांच्या बीजाचे अंकुरांत रुपांतर झाले होते. पण स्त्री शिक्षणाचे स्वरुप काय असावे, कसे असावे या विषयी मतभेद होत होते. मानवाच्या संस्कृतिच्या विकासाच्या दृष्टीने स्त्रियांना शिक्षण दिले जावे. असा हया मतभेदातही एक सूत्र होता. "पुरुषाइतकाच, किंबहुना जास्त महत्वाच्या समाजाचा घटकाविषय स्त्रिया होत. त्यास त्यांच्या नैसर्गिक कर्तव्याने व गुणांनीच जास्त महत्व प्राप्त झाले आहे."[६६] स्त्रिया निर्बुध्द आहेत हा विचार खूप मागे पडला. पुरुष धैर्यवान स्त्री पापभिरुपणाची मूर्ति, हा संकेत बदलला गेला व त्यामुळेच स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले जावे असे विचार मांडण्यांत येऊ लागले.

स्त्री ही भावनाप्रधान आहे. तिच्या या स्वभावाला अनुसरुन तिला शिक्षण द्यावे. मिळालेल्या संधीचा योग्य फायदा स्त्रिया घेतात. सामाजिक परीस्थितीने स्त्री शिक्षणाला एक मर्यादा घालून दिली आहे. तिचे बाल्य, वैवाहिक आयुष्य, कुटुंबाची तिच्यावर पडणारी जबाबदारी या तिन्ही अवस्थात परिपक्वता यावी. मानसिक, बौध्दिक पातळी वाढेल असा अभ्यासक्रम व असे विषय अभ्यासक्रमांत असावेत "असा अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे तो संपविलेल्या मुलीस सर्वांग संस्कृति देणारे शिक्षण मिळालेले असून त्यांच्या निसर्गप्राप्त गुणास व कर्तव्यास पोषक असे ज्ञान त्यास प्राप्त झालेले असावे."[६७] सर्वसाधारणपणे दहा वर्षाचा अभ्यासक्रम असावा त्याचे दोन विभाग करावेत. प्राथमिक शिक्षण मुले मुली साठीच सारखेच असावयास हरकत नाही. मातृभाषा, इतिहास, भूगोल, गणित, सृष्टीज्ञान असे विषय असावेत. दोन वर्षात क्रमिक पुस्तके संपवून नंतर वाङ्मयाचे अध्ययन करावयास लावून

"केसरी व विविधज्ञानविस्तार यांच्या दर्जाचे गद्य मराठी समजावे. चांगले बोलता व लिहिता यावे."[६८] यांत मातृभाषेला प्राधान्य देऊन, वाङ्मयीन अभिरुचि वाढवावी.. जेणे करून स्त्रिया स्वतंत्रपणे आपले विचार मांडू शकतील लिहू शकतील. हिंदी, इंग्रजी भाषेचे ज्ञान व्यवहारापुरते यावे हे ज्ञान संभाषण पध्दतीने द्यावे. व्यवहार समजण्यापुरते गणिताचे ज्ञान, हिंदूस्थानची राज्य-पध्दति व इंग्रजी राज्य पध्दतीगृहव्यवस्था, समाजशास्त्र, बालमानसशास्त्र, आरोग्यविषयक माहिती, शरीरशास्त्र, नीतिशास्त्र, तत्वज्ञान हे विषय उच्च शिक्षणांत असावेत. त्यामुळे तिची बौध्दिक पातळी वाढेल. अंधश्रध्दाळूपणा तिच्यात असल्याने तिला धार्मिक शिक्षणाची आवश्यकता आहे.

व्यवहारिक, धार्मिक, भाषिक, नैतिक शिक्षण दहा वर्षाच्या कालावधीत विभागून तिला द्यावे म्हणजे आपली सांस्कृतिक, सामाजिक, धार्मीक, नैतिक उन्नती होईल व इथल्या कुटूंबसंस्थेला व सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या उच्च संस्कृतिच्या भावनेला तडेही जाणार नाहीत.उलट स्त्री ही व्यक्ती स्वातंत्र्याच्या नव्या कल्पनेनुसार विद्याविभूषीत होऊन स्वत:चे कर्तव्य अधिक दक्षतेने पार पाडील.

याबरोबरच तिला कलाजीवनाचाही परिचय व्हावा. ज्यामुळे आपल्या कलाविश्वातील संस्कृतिचे संवर्धन होईल. गायन, नृत्यकला, हस्तकला, चित्रकला इत्यादि विषयाचे शास्त्र शुध्द ज्ञान तिला मिळावे या पध्दतीने स्त्रीला शिक्षण द्यावे व वरील विषयांचा समावेश त्यात असावा. असे प्रयत्न प्रो. कर्व्यांनी व त्यांच्या युनिव्हर्सिटीचे सिंडेकट यांनी केले होते. स्त्रियांना शिक्षिका, वैद्यक व्यवसाय इतर घरगुती जोडधंद्याने स्वावलंबीही करता येईल. हा परिपक्व विचार प्रस्ताव मांडला होता.

स्त्रियांच्या लेखातील चरित्र आत्मचरित्रातील वैचारिकता.

समाजप्रबोधनाचे कार्य करणाऱ्या विविध ज्ञान विस्ताराने नमूद केलेली अहिल्याबाई होळकर, झांशीचीराणी, व्हिक्टोरियाराणी, आदी तेजस्वी कर्तबगार स्त्रियांचे जीवन चरित्र यात समाविष्ठ केले आहे.

जेणे करून स्त्रियांमधील सुप्तशक्ती जागृत व्हावी व स्वतःच्या तेजाची त्यांना पूर्ण ओळख व्हावी• नवीन विचारांच्या कांही स्त्री लेखीकांनी स्वतःच्या भावनांचा आविष्कार व सामाजिक स्थितीचा आढावा लेखनाच्या माध्यमातून करायला सुरवात केली होती• आनंदीबाई सारख्या विद्या संपन्न स्त्रीचे चरित्र काशीताई कानिटकरांनी लिहिले व सौ• कमळाबाईंनी त्याचे परिक्षण केले• झाशीच्या राणीचे चरित्र लिहिले व स्त्रियांच्या थोरवीचे सामर्थ्याचे चित्र स्त्री समाजापुढे, व सनातनी विचारांच्या वृत्तीपुढे मूर्तिमंत उभे करून स्त्री सामर्थ्याची यथार्थ जाणीव करून दिली• रणांगण, राजकारण गाजवणा-या ह्या स्त्रियां प्रमाणेच तत्कालीन जीवनाला व समस्याना आत्मविश्वासाने सामोरे जाणारी आणखी एक स्त्री कृपाबाई सत्यनाधनहिचा परिचय करून दिला गेला•

शिक्षणा विषयीचा जो अपसमज, समाजमनांत घर करून बसला होता त्याला कृपाबाई सत्यनाधन, आनंदीबाई जोशी, पंडितारमाबाई, रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले, यांनी स्वआचरणाने तडा दिला होता• सत्यनाधन बाई महाराष्ट्रीयन असुनही महाराष्ट्रीयनांना अपरिचित स्त्री, उत्तमकार्यकर्ती समाजहितदक्ष, कर्तव्यपरायण, जिज्ञासू, बुध्दीवान, आणि स्वराज्य, स्वदेशप्रेमाचे मूल्य जाणणारी स्त्री इंग्रजीवर विलक्षण प्रभुत्व, उत्तम लेखिका अष्टपैलू व्यक्तीमत्वाची ही स्त्री महाराष्ट्रीयन समाजस्थितीचे उत्तम आकलन असल्याने तेथील स्त्रियांच्यात शिक्षणाचा अभाव आहे• त्यामुळे पावलोपावली महाराष्ट्रीयन लोक ठेचाळत आहेत• दिशाहीन लोकांनी भानावर येऊन स्त्रियांच्या मूलभूत स्वरूपाचे अवलोकन करावे आणि त्यांची खुरटलेली अवस्था शिक्षणाचे खतपाणी घालून बहरू द्यावी• तिचीचसखी महाराष्ट्रीयन बहीण अतिशय बुरसटलेल्या विचारांची, परंपरापूजक आणि सत्यनाधन बाई मात्र शिक्षणाने सूज्ञ व संपन्न जीवन जगणारी• उटकमंड येथील वास्तव्यात मुलींच्या शिक्षण पध्दतीत सुधारणा केल्या, तेथे यवनांच्या मुलींकरीता शाळा सुरू केली• "एतद्देशीय साधी गरीब अबला देखील कांही उपयुक्त काम करू शकते असे मला जगात दाखवायाचे आहे• "[१९] असे गौरवोद्गार कृपाबाईंच्या संबंधी काढून

समजले जाऊ लागले. त्यांच्या विरोधाला न जुमानता स्त्रीयांना शिकवण्याचा केलेल्याविचारापासून सुधारकांनी आपणास तसूभरही ढळू दिले नाही. ज्योतिराव फुले, प्रो. कर्वे, रमाबाई रानडे इ. कर्त्या विचारवंतानी आपले कार्य चालु ठेवले. हळूहळू त्याचा अपेक्षित विस्तार होण्यास सुरुवात झाली.

स्त्रियांची परवशता गुलाम व परिपक्व विचारांच्या लोकांना अहितकारी वाटू लागली. व तिला शिक्षण दिल्याशिवाय याला पायबंद घालता येणार नाही व तिच्या व्यक्ती विकासाची दालने उघडणार नाहीत. तिच्यातिल आत्मविश्वास पुन्हा जागृत होणार नाही ही वास्तविकता होती तर याउलट स्त्री शिकली तर या भूतलावर अनर्थ होतील, पाप वाढेल, "सन्मार्गी असलेल्या स्त्रियांची स्थिती शिक्षणाने बिघडेल."[४६] स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे कुमार्गी लावणे असे हास्यास्पद विचार स्त्री शिक्षणाविषयी मांडले जाऊ लागले. आजवर अज्ञानी स्त्रियांना मुक्या गाईसारखे जुलमाच्या दावणीला बांधून ठेवणे स्वार्थी समाजाला सहज शक्य होते. "स्त्रीयांस शिक्षा दिली असता त्यांची मने चांगली व्हावयाची व त्यांचा स्वभाव दयाळू व्हावयाचा तो एकीकडे राहून उरफाटया हरामी आणि दुष्ट होतील."[४७] असे ही विचार मांडले जाऊ लागले व स्त्री शिक्षणाला विरोध होऊ लागला. स्त्रीला शिक्षण देण्याच्या विचारात धोके अधिक आहेत असे समाजाला प्रकर्षाने वाटू लागले. पण आपली झालेली मानहानी आपल्याला पत्करावी लागलेली गुलामगिरी समाज दुर्धरांना जाचक वाटत नव्हती, पारतंत्र्याची खंत वाटत नव्हती.

स्त्रीचे अज्ञानत्व जोपासण्यापेक्षा, एकजुटीने त्याचा प्रतिकार करुन राजनिष्ठा, देशभक्ती जागृत करुन आपले स्वातंत्र्य परत मिळवू ही कल्पनाही त्यांना अनभिज्ञ होती पण "राजकीय परिस्थितीचा संताप व उद्वेग पुरुषापेक्षा स्त्रियास जास्त येतो असे रशियातील विद्यार्थीनी वरुनिस्न दिसून येते."[४८] याचा अर्थ स्त्रीयांचा स्वातंत्र्य मिळविण्यात हातभार असणे आवश्यक होते. "स्वदेशीच्या कामे स्त्रियांच्या सहाय्यावाचून कोणतीच फल प्राप्ती होणार नाही."[४९] ही वस्तुस्थिती होती म्हणून स्त्री शिक्षणाच्या विरोधाला न जुमानता शक्य होतील त्या मार्गाने स्त्रियांना शिक्षण दिले जावे असा सुधारकांचा प्रस्ताव होता. राष्ट्रवादी विचारसरणीतही स्त्रीला त्यामुळे प्रतिष्ठा देण्याचा विचार मांडला गेला. आगरकरांच्या विचारांचा प्रभाव "स्वतंत्रता

काढून लेखकाने या कर्तबगार स्त्रीचा गौरव केला आहे. जिला आपण अबला म्हणतो ती प्रत्येक स्त्री जर या सन्मार्गाने गेली तर आपल्या विकासाचा टप्पा फार लांब नाही. व एतद्देशीयांना त्यामुळे शिक्षणावर श्रध्दा बसेल हा एकमेव मानस, ह्या स्त्रीच्या जीवन परिचयामागे आहे. **"Poor girls what can we expect from such stunted impoverished minds?"**[७०] असे उद्‌गार तिने स्त्री जीवन रेखाटतांना "सगुणा" या कादंबरीत काढले आहे. आपल्या निकृष्ठ स्थितीची अजूनही त्यांना कल्पना नाही. तिला सूज्ञ करण्याच्या भूमीकेत आजही "वेडगळ, कुक्कट, हास्यास्पद, असे अनेक धर्माचार धर्ममते, दुराग्रह, इत्यादिकांत कांही फरक पडला नाही." अजूनही ही सामाजिक स्थिती दु:खदायक व दु:सह्य आहे. पुष्कळ स्त्रिया स्वत:च्या उध्दारासाठी, आत्मविकास, आत्मोनती साधण्यासाठी कांहीही प्रयत्न करीत नाहीत. संसार, शृंगार, रूढीचे अंधळेपणानी पालन करणे, मूकपणे अन्याय सहन करणे यात तिची ज्ञानतृष्णा, जागृत होणे शक्यच नाही. तिच्या मानसिक चित्तवृत्ती उदासीनच राहतात. त्यात लोकोपवादाची भिती त्यांना स्वयंकेंद्रितच ठेवते. "सांप्रत पुरूषवर्गाच्या शिक्षणापेक्षा देखील स्त्री शिक्षणाची काकणभर जास्त गरज सर्वत्र भासू लागली आहे कारण त्यामुळे सर्वच गाडा अडून राहिला आहे."[७१] हे मत स्पष्ट आणि खुलेपणाने प्रगट करणारी ही स्त्री आपली भूमिका वैचारिक परिपक्व अवस्थेतून प्रगट करते. तेवढया जागृकतेने समस्येचा अभ्यास केल्याशिवाय असे मत त्यावेळी एका स्त्रीने व्यक्त करणे धाडसाचे आहे.

ऐहिक आणि आध्यात्मिक जीवनाची सांगड घालून, मनाचा समतोल आणि संयम, विकासाच्या वाटेने नेणारा असतो. धर्म हा आचरणाने श्रेष्ठ ठरतो. १९व्या शतकात धर्म मार्तण्डाच्या विचारांना प्रचंड धक्का देऊन संप्रदायवादी विचारसरणी आत्मसात करून जी स्त्री, आधी शिक्षण घेऊन उच्च शिक्षणासाठी समुद्रोल्लंघन करून जाते व महाराष्ट्रातील पहिली डॉक्टरीण होण्याचा इतिहास घडविते. तिचे चरित्र निश्चितच अलौकिक आहे. तिलाही

संसार, स्वाभाव, समज-गैरसमज, या सर्वांना तोंड द्यावे लागले. अशी ही दुसरी कर्तबगार स्त्री. शिक्षणामुळे उद्दामपणा न येता ओजस्विता, दृढनिश्चय आणि ख-या आर्य तेजाचा सुंदर प्रकाश त्यांच्या ठायी दिसून येईल. स्त्री सुशिक्षणाने शेफारून जाणार नाही तर ती समाजाचे भूषण ठरणारे कार्य करू शकेल. हे त्यांच्या चरित्रावरून दिसून येतेच. स्वदेश, स्वराष्ट्र, स्वत्व, स्वसामर्थ्य या शब्दातील भावगांभीर्याला अज्ञ व रूढी ग्रस्त स्त्रियांना समजावून सांगण्याचा यशस्वी प्रयत्न या लेखाने साधला आहे.

आर्य महिला परिषद व महिला समिती, स्थापन झाली व स्वभगिनीच्या उध्दाराचे काम करू लागली. वर्तमानपत्राचा प्रसार हे एक साधन असल्यामुळे सर्व स्त्रियांनी ते वाचून जगात घडणा-या घटनांची दखल घ्यावी व त्यावरून स्वत:चे पाऊल योग्य मार्गाने टाकावे हे कार्य ह्या समितीनी केले. कलकत्ता येथे अखिलभारतीय महिला परिषदेचे सेक्रेटरी पद रमाबाई रानडेंनी सांभाळले. आपणास उन्नतीच्या उच्च शिखरावर पोहचायचे असेल तर महिलांना त्यात सहभागी करून घेणे आवश्यक आहे. "पूर्व संस्कार व नवीन महत्वाकांक्षी देशातील तरुण होतकरू पिढीच्या आंगात उत्तमपणे बिंबविण्यास स्त्रियां शिवाय दुसरे साधन नाही."[७२] हे मत आता सर्वमान्य झाले होते. म्हणूनच स्त्रिया बुध्दिमान नाहीत, अडाणी आहेत, अशिक्षित आहेत याची खंत आणि खेद जर नव्या विचारांच्या पिढीला वाटला तर ही स्थिती सुधारण्यास हातभार लागेल." स्त्रियांच्या उन्नति संबंधीचा प्रश्न हल्लीच्या स्थितीत सर्वस्वी पुरुषांवर अवलंबून आहेत."[७३] म्हणून खरी समाज सुधारणा, घडवून आणायची असेल तर सगळा समाज जागृत झाला पाहिजे. त्याला व्यक्ती स्वातंत्र्याचे मूल्य समजले पाहिजे. समाजात स्त्री विषयक दृष्टीकोन, सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक क्षेत्रात इतका अपुरा आहे. तिच्या व्यक्तीत्त्वाची संकल्पना इतकी उणी होती की त्यामुळे "स्त्रियांच्या जागृतीची प्रक्रिया एवढी साधी व सरधोपट नव्हती."[७४] नवीन विचारसरणीची मूल्ये स्विकारतांना स्त्री जीवनातील समस्या अधिकच गुंतागुंतीच्या होत गेल्या. बुरसटलेल्या, मागासलेल्या विचारांचा बुरखा ह्या

मुखवट्यावरून काढून टाकण्यासाठी सातत्याने असे वाद-संवाद, वाद-प्रतिवाद साधणे व त्या विषयाला अनुकूल प्रतिकूल विचाराने समजावून घेऊन, त्याचे दूर-गामी चांगले व वाईट परिणाम बघणे आवश्यक होते.

स्त्री सुधारणेच्या वैचारिक पार्श्वभूमिकडे बघतांना सुरवातीला पाश्चिमात्यांच्या सांस्कृतिक सहवासाने स्त्रीकडे बघण्याच्या दृष्टीत संवेदनशीलता आली. सहृदयता आली, मग तिच्या वेदनांकडे सहानुभूतिने बघीतले जाऊ लागले. व या सहानुभूतीचे रूपांतर आगरकर, रानडे, फुले, जांभेकर, लोकहितवादी यांनी भूतदयावादी वृत्तीत केले व तिच्या व्यक्ती स्वातंत्र्याचा प्रस्ताव मांडला. व या स्वप्नाला साकार करण्यासाठी विविधज्ञान विस्तारा सारखे ज्ञानवाहक लाभले.

कालबाह्य ठरू पाहणाऱ्या रूढींवर, खोट्या धर्माचरणावर, बुरसटलेल्या विचारसरणीच्या लोकांवर विविधज्ञान विस्तारातून सतत हल्ले केले गेले. स्त्री जीवनावर प्रकाश टाकणारे लेख यात प्रसिध्द झाले.

<u>समारोप:-</u> विविधज्ञान विस्तारात प्रसिध्द होणाऱ्या सर्व स्त्री विषयक हे लेखांचा दर्जा हा विचारसंपन्न प्रश्नाचा मूलभूत उहापोह करून, त्याचे दूरगामी परिणाम बघून तत्कालीन स्थितीचा आढावा घेणारे आहेत. त्यात सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, विचारांची ही परिपक्व भूमिका आहे. परिवर्तनवादी व त्यास विरोध करणारे, पुरोगामी हे दोन्हीही पक्ष व्यासंगी व बहुश्रुत आहेत. त्यामुळे जुन्या-नव्याचा हा संघर्ष होऊन शुध्द, वैचारिक बैठकीवर स्त्रीजीवनाचा नव्या विचारानुषंगाने सर्वार्थाने विचार केला गेला आहे. हे आता पर्यंतच्या सविस्तर विवेचनावरून लक्षात येते. समाजाला मिळालेली कलाटणी वरील लेखांच्या अभ्यासातून स्पष्ट होते. असे वैचारिक प्रबोधन म्हणजे प्रगतीचे पुढचे पाऊल ठरते असे म्हटल्यास वावगे होणार नाही. प्रस्तुत प्रकरणात बालविवाहीची रूढी व तिचे अनिष्ठ परिणाम स्त्री, समाज, राष्ट्र आणि देशहिताचा दृष्टीकोनातून बघितले गेले व त्याला विरोध करणारे विश्वनाथ मंडलिक यांनी सहा लेखातून बालविवाह अनिष्ठ प्रथा नाही हे पुरोगामी मत पटवून देण्याचा प्रयत्न केला असला तरी एकंदर स्त्री जीवनाला मानसिक, शारीरिक आणि बौध्दीक पातळीवरून कमी दर्जा आणणारी ही घातकी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रवृत्ती बंद व्हावी हेच विचार सुज्ञांना पटतात.

पुनर्विवाह करणे म्हणजे समाजाची संस्कृति पवित्र ठेवण्याची हमी घेणे आहे. चोरून लपून व्यभिचार करुन स्त्रियांना अत्यंत हीन परिस्थितीत दिवस काढायला लावण्यापेक्षा विवेकाने विकार-विकृति आणि वासनेवर अंकुश धरणारी ही सुधारणा केव्हाही समाजहिताची ठरेल. असा निष्कर्ष काढल्यास तोही यथार्थच ठरेल. मुरळ्या, देवदासी, कन्याविक्रीय हे तिन्ही प्रकार स्त्रियांची दुर्दशा करणारे आहेत. पुरुषप्रधान संस्कृतित पुरुषांना समर्थशाली समजून नर "अबला" म्हणविणा-या स्त्रियांनी आपले शील त्या सामर्थ्यावर निर्भर राहण्याची अपेक्षा बाळगली असेल तर त्याला त्यामुळे तडा जातोच व स्त्रियांचे उघडपणे शोषण करणारा एक वर्ग इथे स्त्रियांचे शील चारित्र्य हरण करुनही पून्हा प्रतिष्ठीतच राहतो. ही गोष्ट मानवतेला लांच्छनास्पद ठरणारी आहे. म्हणूनच भांडारकरांनी या प्रथेविरुध्द झोड उठविली. विधवांचे जीवन हे सुध्दा जनावरांपेक्षाही दयनिय, हालअपेष्टेचे असते. त्यामुळे या दु:खाने, यातनेने आणि मानहानीने ती कायम दुर्मुखलेली बनते. हे जीवन स्वत:च करपून गेलेले असल्याने कडक नियमांच्या बंधनाने स्त्री जवळ असणारे सद्गुण, सदाचार, कुटुंबाच्याही कामी येत नाही आणि समाजाच्याही कामी येत नाही. बालविधवा, प्रौढविधवा, जर शिकून स्वावलंबी झाल्या तर, त्यांची सेवाभावी वृत्ती समाजाला उपयुक्त ठरेल आणि त्यांच्या सुदृढ विचारांनी समाजात सदवर्तनाचे आरोग्यदायी वातावरण निर्माण होईल.

स्त्रियांना स्वतंत्रपणे व्यक्तीमत्व घडविता येईल, समाजाला त्यांच्या बुध्दी आणि भावनेचा उपयोग होईल. म्हणून स्त्रीला शिक्षणाची आवश्यकता आहे व तिला ते दिले गेले पाहिजे. ही भूमिका इथे लेखकांनी आपल्या लेखातून मांडली आहे.

ब्रिटिशांकडून मिळालेल्या या प्रेरणेचा उपयोग निश्चितपणे स्त्री जीवनाचा विचार स-हदयतेने करायला लावणारा होता व महाराष्ट्रातील विचारवंतांनी नि:संदिग्धपणे स्त्रिया व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार, अनुकूल

गत प्रगटनातून केला आहे. त्यांनी प्रतिकूल मत मांडले त्यालाही पुरावे आहेत व ध्येयाची, परंपरेच्या पावित्र्याची जोपासना व्हावी हा सद्भाव त्यातून प्रगट झाला आहे.

एकंदर वैचारिक पातळीवरून स्त्रीजीवनाचा विचार होऊन तिच्या दु:खगर्भित जीवनाला नवी दिशा आणि दशा देणारा काळ येणे ही बदलत्या समाजजीवनाची गरज आहे. हे स्पष्ट झाले तसेच त्या व्यक्तीमत्वाचे मोलही समाजाला पटले व तिचे सहकार्य हा आपल्या संपन्नतेची वैभवाची नांदी आहे हे ही समजून आले. स्त्रियांचा सहकार, साहचर्य, सहवास, शक्ती, बुध्दी सामर्थ्य हे समृध्द संस्कृतिचे दालन आहे हा उदात्त विचार करावयास आपण प्रवृत्त झालो होतो हे यावरून स्पष्ट होते. वैचारिक आंदोलनाने हा भाव महाराष्ट्रीयनांच्यामनात रूजविला होता. विविधज्ञानविस्ताराचा वाटा या विकासाच्या टप्प्यावर फार मोलाचा होता हे आत्ता पर्यंतच्या विवेचनावरून पटते.

अभ्यासलेल्या लेखांची सूचि:-

कृपाबाई सत्यनाघन (पु. ३० अंक १२ पान ३८०) लेखक वा. ना. देव, मुलीचे लग्न (पु. ५ अंक ५, पा. ९७) रा. भी. गुंजीकर, बालविवाहाचा अनुभव, समाजचित्र ३ (पु.४८ अंक ८ पा. ३२९), सौ. कमळाबाई किबे, डॉ. पेची फिप्सनबाई एम.डी. हयांनी इंग्रजी भाषेत दिलेले व्याख्यान(पु.२२ अं.१० २१७), अहिल्योध्दार (ना.के.बे.) श्री. द. शिदोरे,(पु.६२, अं,२ पान७१), अंतिम सहारयमासिक समालोचन (पु.३८ अंक ८ सा.१९०७), स्त्रियांचे अधिकार वि. प. पंडीत(पु.५ अं.६ पा.११५), माता अणि बालक (पु.४ अं१०, पा. १८१), स्त्रीचे तेज(पु.५ अं.६ पा.११५) कलकत्ता येथील महिला परिषद (पु.३८ अं.२ पा.६५), भारतवर्षीय युवतीरत्नमाला, रा. रा. अनंत केशव चितळे अ.के. पुस्तक परिक्षा,(पु.३१ अं.७ पा.२४५) आईची थोरवी व तिची कर्तव्ये (पु.३० अं.९ पा.२८५) वि.वि.ज्ञा.वि. बालोपयोगी साहित्य, सौ. कमळाबाई किबे महाराष्ट्र साहित्य पत्रिका (अं.४ पु.१ पा २८:४८:३) स्त्री जीवनावर प्रकाश गो. म. चिपळूणकर लेखांक २ (पु.५१ अं.१२ पा.४३१)

[illegible]: स्त्री शिक्षणाचे खरे ध्येय व दिशा पा॰ दा॰ गुणे (पु॰४७ अं॰८ पा॰३३४)

इत्यादि लेखांच्या आधारे स्त्री विषयक लेखातील वैचारिकतेचा अभ्यास केला आहे॰

=०=

## संदर्भ सूचि


| | |
|---|---|
| १) प्रबोधनाच्या पाऊल खुणा ज्ञाननिष्ठा व समाज परिवर्तन पान नं. (६३) | गं. बा. सरदार यांचे निवडक लेख आ.प. |
| २) गं. भा. निरंतर प्रस्तावना पान नं. (१) | विचारधारा प्रस्तावना पान १ |
| ३) निर्मलकुमार फडकुले | निवडक लोकहितवादी प्रस्तावना पान नं. (३) |
| ४) स. रा. गाडगीळ | लोकायत पान नं. ६६ |
| ५) संपादक डॉ. स. गं. मालशे | स्त्रीपुरुष तुलना प्रस्तावना पान नं. ५ |
| ६) स. रा. गाडगीळ | लोकायत प्राचीन भारतातील स समाज पान नं. ७५ |
| ७) निर्मल कुमार फडकुले | लोकहितवादी पान नं. (५) |
| ८) किरता | |
| ९) संपादक सं. ग. मालशे | जोतिराव फुले समग्र वाङ्मय |

| | | |
|---|---|---|
| १०) | अविनाश सहस्त्रबुध्दे | समाज आणि साहित्य<br>पान नं. (३) |
| ११) | कित्ता | |
| १२) | रा. श्री. जोग | मराठी वाङ्मयाचा इतिहास<br>प्रस्ताविक पान नं. (९)<br>आ. पहिली |
| १३) | प्रकाशक<br>अ. अ. कुलकर्णी | प्रदक्षिणा<br>मराठीतील निबंध वाङ्मय<br>वि. स. खांडेकर<br>पान नं. १११<br>सुधारित आवृत्ती ४ |
| १४) | निर्मलकुमार फडकुले | लोकहितवादी<br>पान नं. २२<br>आ. |
| १५) | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | हिंदुधर्माची समीक्षा<br>पान नं. (९)<br>प्र. आ. |
| १६) | Winitred Holtby | Women and Changing<br>Civilization<br>P. No. 4 |

| | |
|---|---|
| १७) रा. श्री. जोग | मराठी वाङ्मयाचा इतिहास<br>निबंध वाङ्मय<br>पान नं. ५०९. |
| १८) विविध ज्ञान विस्तार | कृपाबाई सत्यनाधन<br>बा• ना• देव<br>पु• ३०, अंक १२ पा• ३८० |
| १९) वि• वि• ज्ञा• वि• | मुलीचे लग्न<br>रा• भि• गुंजीकर<br>५/५/१७<br>पु• अ• पा• |
| २०) वि• वि• ज्ञा• वि• | बालविवाहाचा अनुभव<br>समाजचित्र ३<br>सौ• कमळाबाई किबे<br>४८:८:३२९ |
| २१) वि• वि• ज्ञा• वि•(किता) | बाल विवाहाचा अनुभव<br>समाजचित्र ३•<br>४८:८:३२९ |
| २२) वि• वि• ज्ञा• विस्तार | डॉ• पेचीफिप्सनबाई<br>एम• डी•ह्यांनी इंग्रजी भा<br>भाषेत दिलेले व्याख्यान<br>पु• २ अंक १० पा•२२७ |

| | |
|---|---|
| २३) गो॰ ग॰ आगरकर<br>निबंधमाला<br>संपादक | निबंध माला<br>बालविवाह<br>पा नं॰ ९४<br>आ॰ |
| २४) विविध विज्ञान ज्ञान विस्तार | बाल विवाह<br>डॉ॰ पेची फिप्सन बाई<br>पु॰ २२ : अंक १०:पान २१७ |
| २५) वि॰ वि॰ ज्ञा॰ वि॰<br>कित्ता | कित्ता |
| २६) कित्ता | |
| २७) वि॰ वि॰ ज्ञा॰ वि॰ | समाजचित्र<br>बालविवीहाचा अनुभव<br>सौ॰ कमळाबाई किब्बे<br>४८:८:३२९ |
| २८) कित्ता | पान नं॰ ३२८<br>४८:७:२७३ |
| २९) गो॰ ग॰ आ॰ | निबंधमाला |
| ३०) वि॰ वि॰ ज्ञा॰ वि॰ | नारायण केशव बेहेरे<br>अहिल्योध्दार<br>श्री॰ द॰ शिदोरे<br>पु॰ ६२ अं २ पृ॰ ७१ |

| | |
|---|---|
| ३१) वि. वि. ज्ञा. वि. | अंतिम साध्य मासिक<br>समालोचन<br>अंक ८ पु. ३८ पा. |
| ३२) उषाहस्तक | वि. स. खांडेकर एकचिंतन<br>स्त्रीविषयक दृष्टीकोन<br>पा. नं. |
| ३३) वि. ज्ञा. वि. | अंतिम साध्य मासिक<br>समालोचन<br>अंक ८ पु.३८ १९०७ |
| ३४) किता | कर्तव्य जागृति. |
| ३५) लोकहितवादी<br>कृत निबंध संग्रह | संपादक<br>अ. का. प्रियोळकर<br>द्वि. आ. १९६७<br>पुनर्विवाह पत्र नं. १०४<br>पान नं. २६० |
| ३६) किता | |
| ३७) वि. वि. ज्ञा. वि. | अहिल्योध्दार<br>नारायण केशव बेहेरे<br>श्री. द. शिदोरे<br>पु. ६८ अं. २ पा. ७१ |

| | |
|---|---|
| ३८) कित्ता | " |
| ३९) वि· वि· ज्ञा· वि· | स्त्रियांचे अधिकार<br>विष्णू परशुराम पंडित<br>पु· ५ अ· ६ पा· ११५ |
| ४०) वि· वि· ज्ञा· वि· | माता आणि बालक<br>पु·४ अंक १० पा १८१<br>ले· |
| ४१) | |
| ४२) वि· वि· ज्ञा· वि· | स्त्रीचेतेज |
| ४३) | वि· स· खांडेकर |
| ४४) डॉ· रा· शं· वाळिंबे | महाराष्ट्राची सामाजिक<br>पुनर्घटना<br>आ· प· पान नं· ८६ |
| ४५) कित्ता | |
| ४६) बाळशास्त्री जांभेकर | दर्पण ता· २८ मार्च १९३४ |
| ४७) कित्ता | |

| | |
|---|---|
| ४८) वि॰ वि॰ ज्ञा॰ विस्तार | कलकत्ता येथील<br>महिला परिषद<br>पु॰ १८ अंक २ पा॰ ६५ |
| ४९) वि॰ वि॰ ज्ञा॰ वि॰ किता | " |
| ५०) गो॰ ग॰ आगरकर | निबंध संग्रह<br>आ॰ पान नं॰<br>प्राथमिक शिक्षण सरकारचे<br>अवश्य कर्तव्य आहे<br>पान नं॰ ११२ |
| ५१) डॉ॰ सरोजिनी बाबर | स्त्री शिक्षणाची वाटचाल<br>आद्य प्रवर्तक पान नं॰१०० |
| ५२) किता | युग वाणी<br>पान नं॰ १०५ |
| ५३) वि॰ वि॰ ज्ञान वि॰ | भारत वर्षीय युवती<br>रत्न माला<br>प्र॰ रा॰ अनंत केशव<br>चितळे पुस्तक परिक्षण<br>अंक पृ॰ पा॰ |
| ५४) वि॰वि॰ज्ञा॰ वि॰ | कलकत्ता येथील महिला परि-<br>षद पु॰ ३८ अं॰ २ पा॰ ६५ |

५५) किता

५६) अ. अ. कुलकर्णी — प्रदक्षिणा
नाट्यवाङ्मय व त्याचा
विकास
आ.
पान ४८

५७) वि. वि. ज्ञा. वि. — आईची थारवी व तिची
कर्तव्य
पु. ३० अ. ९ पा. २८५

५८) महाराष्ट्र साहित्यपत्रिका — बालोपयोगी साहित्य
सौ. कमळाबाई किबे
४ अ. १ पा २८:४८:३

५९) गं. बा. सरदार — महाराष्ट्र जीवन
परंपरा प्रगती आणि समस्या
समाजकारण पान नं. ३०९
आ. प. १९६०

६०) वि. वि. ज्ञा. वि. — स्त्रीजीवनावर प्रकाश
गो. म. चिपळूणकर
लेखांक २
पु. ५९ अ. १२ पा ४३९

६१) किता — "

| | |
|---|---|
| ६२) किता | " |
| ६३) किता | " |
| ६४) किता | " |
| ६५) किता | " |
| ६६) वि• वि• ज्ञा• वि• | स्त्रीशिक्षणाचे खरे ध्येयव दिशा<br>पु•४७ अ• ८ पा• ३९५ |
| ६७) किता | जा. दा• गुणे |
| ६८) किता | |
| ६९) वि• वि• ज्ञान वि• | मिसेस कृपाबाई सत्यनाधन<br>बा• ना• देव<br>पु• अं• पा• |
| ७०) किता | |
| ७१) किता | |
| ७२) वि• वि• ज्ञा• वि• | कलकत्ता येथील महिला परिषद<br>पु• अ• पा• |

७३) किस्सा

७४) हिंगणे स्त्री शिक्षण संस्था

भारतीय स्त्री
आधुनिक मराठी साहित्या-
तील स्त्री पान नं. ९५
आ. १ली १९६७
पु. का. संत